POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२४४ ● मुंबई, मंगळवार, ०७ एप्रिल २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## छ. संभाजीनगरमध्ये बेकायदेशीर गर्भपात रॅकेटचा पर्दाफाश

### जिल्हा परिषद शाळेसमोरच सुरु होते नको ते प्रकार, दोन बहिणींना बेड्या, मुख्य नर्स फरार



**15 हजारांत जीवघेणा खेळ... पोर्टेबल मशीनचा वापर**

तपासात अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली आहे. या रॅकेटची मास्टरमाइंड ज्योती भीमराव पवार ही असून ती स्वतः एक जीएनएम नर्स आहे. अवघ्या 15 हजार रुपयांसाठी पोर्टेबल मशीनच्या सहाय्याने गर्भलिंग तपासणी केली जात होती. जर गर्भ मुलीचा असेल, तर गोळ्या देऊन गर्भपात केला जायचा. महिलेची प्रकृती किंवा परिस्थितीनुसार तिला दुसऱ्या ठिकाणी पाठवून लाखो रुपये उकळले जात असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

छत्रपती संभाजीनगर शहरालगतच्या सातारा परिसरात माणुसकीला काळिमा फासणारी एक घटना उघडकीस आली आहे. जिल्हा परिषद शाळेच्या अगदी समोरच बेकायदेशीर गर्भपात करणाऱ्या एका टोळीचा जिल्हा प्रशासनाने आणि पोलिसांनी संयुक्त कारवाई करत पदार्फाश केला. या कारवाईत दोन सख्ख्या बहिणींसह रुग्णाच्या पतीला रंगेहाथ पकडून बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. मात्र, या रॅकेटची मुख्य सूत्रधार असलेली नर्स अद्याप फरार असून पोलीस तिचा शोध घेत आहेत.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, सातारा गावातील जिल्हा परिषद शाळेच्या समोरील परिसरात बेकायदेशीर गर्भपात केला जाणार असल्याची कुणकुण प्रशासनाला लागली होती. एका 23 वर्षीय विवाहित महिलेला गर्भपातासाठी तिची नणंद आणि नवरा घेऊन आले होते. त्याच वेळी दबा धरून बसलेल्या पथकाने छापा टाकला आणि या रॅकेटचा भांडाफोड केला. या कारवाईत पोलिसांनी दोन महिला (ज्या सख्ख्या बहिणी आहेत) आणि एका पुरुषाला ताब्यात घेतले आहे.

**मास्टरमाइंड नर्स फरार**

छापा पडल्याचे लक्षात येताच मुख्य सूत्रधार ज्योती पवार हिने पोलिसांना गुंगारा देऊन तिथून पळ काढला. ती सध्या फरार असून पोलीस तिचे धागेदोरे शोधत आहेत. याप्रकरणी सातारा पोलीस ठाण्यामध्ये सर्व आरोपींविरुद्ध पीसीपीएनडीटी कायदा आणि भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. शाळेसारख्या पवित्र वास्तूच्या समोरच असे घृणास्पद कृत्य चालत असल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

हे रॅकेट किती काळापासून सक्रिय होते आणि यात आणखी कोणत्या मोठ्या डॉक्टरांचा किंवा रुग्णालयांचा समावेश आहे का? याचा सखोल तपास आता पोलीस करत आहेत.

## वसई-विरारमध्ये मृतदेह सापडण्यांची मालिका सुरूच

### १५ दिवसांत ६ घटना, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**■वसई-विरार। प्रतिनिधी,**

वसई-विरार आणि नालासोपारा परिसरात गेल्या काही दिवसांपासून अज्ञात मृतदेह सापडण्याच्या घटनांनी गंभीर वळण घेतले असून, अवघ्या १५ दिवसांत सहा मृतदेह आढळल्याने नागरिकांमध्ये भीती आणि असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. रविवारी सायंकाळी मुंबई-अहमदाबाद महामार्ग वरील विरार फाटा येथे सडलेल्या अवस्थेतील एका पुरुषाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली.

**कचऱ्याजवळ सडलेल्या अवस्थेत मृतदेह**

स्थानिकांना दुर्गंधी आल्याने त्यांनी परिसरात शोध घेतला असता कचऱ्याच्या ढिगाऱ्याजवळ एक मृतदेह दिसून आला. मृत व्यक्तीचे वय अंदाजे ४५ ते ५० वर्षे असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. मांडवी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून मृतदेह ताब्यात घेतला आणि शवविच्छेदनासाठी पाठवला. हा मृत्यू नैसर्गिक, अपघाती की घातपात, याचा तपास सुरू आहे.

**१५ दिवसांत सहा मृतदेह**

गेल्या दोन आठवड्यांत या परिसरात सापडलेल्या मृतदेहांची मालिका चिंताजनक आहे.

२१ मार्च : शिरवली येथे महिलेचा कुजलेला मृतदेह; पती अटकेत २३-२४ मार्च : धानिवबाग येथे ६ वर्षीय बालिकेचा विहिरीत मृतदेह २६-२७ मार्च : पेल्हार फाटा येथे शिरच्छेद अवस्थेत पुरुषाचा मृतदेह मार्च अखेर : नालासोपारा पश्चिम येथे नाल्यात अज्ञात महिलेचा मृतदेह ३०-३१ मार्च : फुलपाडा येथे अज्ञात इसमाचा मृतदेह ५ एप्रिल : विरार फाटा येथे सडलेल्या अवस्थेत पुरुषाचा मृतदेह

**नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण**

सतत उघड होत असलेल्या घटनांमुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. "गुन्हेगारांना पोलिसांचा धाक उरला नाही का?" असा सवाल स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे. निर्जन भाग, अपुरी प्रकाशयोजना आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा अभाव यामुळे गुन्हेगारांना वाव मिळत असल्याची तक्रारही नागरिक करत आहेत.

**पोलिसांसमोर तपासाचे आव्हान**

काही प्रकरणांत आरोपींना अटक करण्यात पोलिसांना यश आले असले, तरी अनेक मृतदेहांची ओळख पटवणे अद्यापही आव्हानात्मक ठरत आहे. बेपत्ता व्यक्तींच्या तक्रारींचा आधार घेत तपास सुरू असून, या घटनांमागील सत्य लवकरच समोर येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.




वसई-विरार पट्ट्यात सलग सापडणारे मृतदेह ही गंभीर बाब ठरत असून, या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांकडून कडक उपाययोजना आणि देखरेख वाढवण्याची गरज नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## मिरा-भाईंदर महापालिकेची २५८ कोटी मालमत्ता कर वसुली

**■भाईंदर। प्रतिनिधी,**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाकडून ३१ मार्च २०२६ रोजी मध्यरात्रीपर्यंत २५८ कोटी 84 लाख एवढी मालमत्ता कर वसुली करण्यात आली आहे. महापालिकेत मालमत्ता कर हे उत्पन्नाचे प्रमुख साधन असून, चालू आर्थिक वर्षात थकीत कर वसुलीस प्राधान्य देत विविध प्रभावी उपाययोजना राबवण्यात आल्या. दीर्घकालीन थकबाकीदारांवर मालमत्ता जप्ती, जाहीर लिलावाची कार्यवाही, तसेच व्यापक जनजागृती मोहीम राबवण्यात आली. या सर्व उपाययोजनांना नागरिकांचा सकारात्मक प्रतिसाद लाभला असून मोठ्या प्रमाणावर कर भरणा करण्यात आला आहे. पालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा



यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त आयुक्त (कर), उपायुक्त (कर), सहाय्यक आयुक्त (कर) व सर्व प्रभागातील अधिकारी, कर निरीक्षक व कर्मचारी यांनी ही कामगिरी साध्य केली आहे. गेल्या वर्षी ३१ मार्च २०२५ पर्यंत २३० कोटी ९७ लाख रुपये कोटीची मालमत्ता कर वसुली करण्यात आली होती. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाची मालमत्ता कर वसुली ही उत्कृष्टरित्या व वेगाने झाली आहे. विशेष करुन या आर्थिक वर्षात महापालिकेने अभय योजना लागू केली नसतानाही मालमत्ता कर वसुलीत २८ कोटी एवढी वाढ झाली आहे.

माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून बनवण्यात आलेल्या WWW.MBMC.GOV.IN वेबसाईट व MYMBMC मोबाईल पचा वापर करून मालमत्ता कर भरणा करण्यासाठी नागरिकांना आवाहन करण्यात आले होते. या आवाहनास नागरिकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. ऑनलाईन पद्धतीवर विशेष भर देत १ लाख ६७ हजार नागरिकांनी १३५ कोटी ७४ लाख रुपए तर रोख रक्कम आणि धनादेशद्वारे १ लाख ४६ हजार नागरिकांनी १२३ कोटी १० लाख रुपये मालमत्ता कर भरणा केला आहे.

## विरारमध्ये आणखी २ प्लॅटफॉर्मवरून धावणार १५ डब्यांच्या लोकल

**■विरार। प्रतिनिधी,**

पश्चिम रेल्वेच्या विरार रेल्वे स्थानकावर प्लॅटफॉर्म विस्तारीकरणाचे काम यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहे. यामुळे आता या स्थानकावर १५ डब्यांच्या लोकल ट्रेन सहजपणे थांबू शकतील. प्लॅटफॉर्म क्रमांक ३ आणि ४ ची रुंदी ४ मीटरने वाढवण्यात आली असून, हे काम 'मुंबई रेल्वे विकास महामंडळाने' अवघ्या ४ महिन्यांच्या विक्रमी वेळेत पूर्ण केले आहे. यासोबतच, स्थानकाच्या पश्चिम भागात नवीन 'होम प्लॅटफॉर्म क्रमांक ८' देखील तयार करण्यात आला आहे. यामुळे विरार स्थानकावरून सुटणाऱ्या आणि येणाऱ्या लोकल गाड्यांचे संचलन अधिक सुलभ आणि शिस्तबद्ध होणार आहे. लवकरच या नवीन प्लॅटफॉर्मवरून १५



डब्यांच्या लोकल सेवा सुरू केल्या जातील. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, तयार झालेले सर्व प्लॅटफॉर्म लवकरच पश्चिम रेल्वेच्या प्रशासनाकडे सोपवण्यात येतील.

**विरार-डहाणू कॉरिडोरमध्ये मोठे बदल**

विरार-डहाणू रोड चौपदरीकरण प्रकल्पांतर्गत विरार रेल्वे स्थानकावर मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू आहेत. भविष्यात वाढणारी प्रवाशांची संख्या लक्षात घेऊन रेल्वे सुविधांमध्ये सुधारणा करणे आणि १५ डब्यांच्या लोकलची वाढती मागणी पूर्ण करणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. या कामांमुळे विरार-डहाणू दरम्यानचा रेल्वेचा पायाभूत आराखडा अधिक मजबूत होईल. नुकतीच पश्चिम रेल्वे आणि MRVC च्या समन्वयाने १५ डब्यांच्या लोकलची यशस्वी चाचणी देखील पूर्ण झाली आहे.

"विरार स्थानकावरील क्षमता वाढवण्याचे हे काम पूर्ण सेक्शनसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रवाशांची सुरक्षा आणि प्रवासात कमीत कमी अडथळा निर्माण होईल याची काळजी घेत MRVC आणि पश्चिम रेल्वेच्या समन्वयाने हा प्रकल्प पूर्ण करण्यात आला आहे."

– विलास वाडेकर, अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, MRVC

## तुमचा वर्षाचा पगार नाही एवढी मोठी लाच, मंत्रालयातील कक्ष अधिकारी जाळ्यात... एसीबीने ठोकल्या बेड्या

**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्याचं प्रशासन सेवेतलं सर्वोच्च स्थान, केंद्रबिंदु असलेल्या मंत्रालयात काही दिवसांपूर्वी एका अधिकाऱ्यास, मंत्र्याच्या स्वीय सहायकास लाच घेताना रंगेहाथ अटक करण्यात आली होती. त्यानंतर, मंत्रालयातल्या आणखी एका अधिकाऱ्याला लाच घेतला लाच लुचपत प्रतिबंधन विभागाने अटक केली आहे. खारघर परिसरात लाच घेताना सापळा रचून एसीबीकडून लाचखोर अधिकाऱ्यास बेड्या ठोकण्यात आल्या. अर्थ व नियोजन विभागात कक्ष अधिकारी म्हणून असणारे विलास लाड यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. निधी मंजूर करून देण्यासाठी तब्बल ६ लाख ३७ हजार रुपयांची मोठी लाच घेताना अटकेची कारवाई करण्यात आली.

मंत्रालयातल्या कामासाठी लाच घेण्याचा प्रयत्न केल्याचं दुसर मोठ प्रकरण समोर आलं असून मंत्रालयातल्या लाचखोरीला चाप बसवण्यासाठी



एसीबीने पुन्हा एकदा मोठी कारवाई केली आहे. विशेष म्हणजे मार्च महिन्यात एसीबीने कारवाईचा धडाका लावला होता, तेव्हा मार्च एन्डमुळे ही कारवाई होत असल्याची चर्चा प्रशासकीय वतुर्ळात होती. मात्र, आता एप्रिल महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात एसीबीने पुन्हा एकदा आपला मोर्चा थेट मंत्रालयात वळवला आहे. मंत्रालयातील कक्ष अधिकारी असलेल्या विलास लाड याला रंगेहाथ अटक करण्यात आली. विशेष म्हणजे सर्वसामान्य माणसांचा एका वर्षाचा पगारही नसतो, तेवढी मोठी रक्कम लाच स्वरुपात हा अधिकारी एका दिवसात घेत होता. त्यामुळे, प्रशासन आणि सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचार व सर्वसामान्यांची होणारी पिळवणूक हा मुद्दा पुन्हा एकदा समोर आला आहे.

ग्रामविकास विभागाचा निधी मंजूर करुन देण्यासाठी या अधिकाऱ्याने लाच मागितली होती, त्यानुसार ६ लाख ३७ हजार रुपयांची लाच स्वीकारताना एसीबीने लाचखोर आरोपीस अटक केली. खारघर परिसरात एसीबीने ट्रॅप रचून ही कारवाई केल्याने मंत्रालयातील प्रशासकीय वतुर्ळात आणि प्रशासनात खळबळ उडाली आहे.

## अवघ्या 3 दिवसात 5 खून, टोळीयुद्ध नांदेडला कुठे घेऊन चाललंय?

**■नांदेड। प्रतिनिधी,**

अवघ्या तीन दिवसात खुनाच्या पाच घटनांनी नांदेड शहर हादरलंय. या घटनांमुळे शहरात गँगवॉरने डोके वर काढल्याचं दिसतंय. टोळीयुद्धाच्या या घटनांमुळे सामान्य नांदेडकरांमध्ये दहशत निर्माण झालीय. काय घडलंय नेमकं? सविस्तर जाणून घेऊया.

तीन एप्रिल शुक्रवारी मध्यरात्री नांदेड शहरात दीडच्या सुमारास सदा गँग आणि साई लाला गँगमध्ये टोळीयुद्ध झालं. यात अर्जितसिंग आणि मोहम्मद अरबाज या दोघांचा मृत्यू झाला. धक्कादायक म्हणजे या घटनेत जखमी झालेल्या सय्यद आवेझला शासकीय रुग्णालयात दाखल केले जात असताना मयत अर्जितसिंग च्या भावाने त्याच्यावर चाकू हल्ला करून त्याला ठार केला.

पोलीस आणि रुग्णालयातील सुरक्षा दलाच्या जवानांसमोरच ही हत्या झाली. दुसरी घटना चार एप्रिल, शनिवारी, मुरमुरा गल्लीत रज्जुसिंग तबेलेवाले याचा खून




झाला. तर सोमवारी सहा एप्रिलला सकाळी श्रीनगरच्या मुख्य रस्त्यावर सोनू कल्याणकरचा खून करण्यात आला. रिंदा गँगचा गोलू मंगनाळें 2021मध्येही सोनूवर गोळीबाराचा प्रयत्न केलेला, त्यावेळी सोनू थोडक्यात बचावला होता. मात्र सोमवारी त्याचा गेम झाला. टोळीयुद्धाच्या सलग घडत असलेल्या या घटनांमुळे मात्र सामान्य नांदेडकर दहशतीत आहेत.

एकापाठोपाठ घडलेल्या खुनाच्या या घटनांनी नांदेड शहर हादरलंय. वाढत्या गुन्हेगारींमुळे शहरात कायदा सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न उभे राहिलाय. गुंडाना राजाश्रय मिळणार नाही पोलिसांनी योग्य ती कारवाई करावी, अशी प्रतिक्रिया खासदार अशोक चव्हाणांनी दिलीय.

नांदेड शहरात 2016पासून रिंदा गँगची दहशत होती. मूळचा नांदेडचा हरविंदरसिंग संधू उर्फ रिंदा पंजाबमध्ये मोठा गँगस्टर होता. 2022 मध्ये खंडणीसाठी प्रसिद्ध उद्योजक संजय बियाणी यांची रिंदा गँगने हत्या केली होती. त्यानंतर नांदेड पोलिसांनी नांदेडमध्ये बिगनिया गँग विक्की चव्हाण,रिंदा गँगच्या जवळपास पन्नास सदस्यांवर मोक्कांतर्गत कारवाई करत मुसक्या आवळेलेल्या, मात्र शहरात आता पुन्हा काही टोळ्या सक्रीय झाल्या आहेत. पोलिसांच्या या इशा-यानंतर टोळीयुद्धाचं सत्र थांबतय का हे पाहणं गरजेचं आहे.

## नवी मुंबईतील भोंदूची विकृती उघड

### काळी जादू करण्यासाठी महिलांना विवस्त्र व्हायला सांगत...

**■नवी मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यात सध्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण चांगलेच चर्चेत आहे. अशातच आता नवी मुंबईतून अशीच एक धक्कादायक घटना समोर आली आहे. कळंबोलीत असणाऱ्या अब्दुल रशीद उर्फ बाबाजान या भोंदूबाबाने काही महिलांवर काळी जादू करण्याच्या बहाण्याने लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणी दोन महिलांनी या भोंदूबाबाविरोधात पोलिसांत गुन्हे दाखल केले आहेत.

अब्दुल रशीद उर्फ बाबाजान लोकांना अल्लाचे महत्व पटवून देत विश्वास मिळवायचा. तर कधी काळ्या जादूची भीती दाखवायचा तसेच गोड बोलून महिलांवर छाप पाडायचा. आर्थिक, वैवाहित समस्या दूर करतो सांगून लोकांना फसवायचा. काळी जादू करण्याच्या बहाण्याने त्याने खालापूर येथे विवाहित महिलेवर अत्याचार केला.



काळी जादू करण्याचे सांगून अब्दुल रशीद महिलांना एकट्यात बोलावत होता. खालापूर येथे निर्जस्थळी बांधलेल्या फार्महाऊसवर तो महिलांना घेऊन जात होता. तसेच मध्यरात्री काळी जादू करण्याचे सांगत तो महिलांच्या अंगावरील वस्त्रे काढायला सांगायचा आणि पूजा करायला भाग पाडायचा. महिलांनी विरोध केला तर त्यांना जीवे मारण्याची धमकी देत हा भोंदूबाबा त्यांच्यावर अत्याचार करत होता.

अब्दुल रशिद उर्फ बाबाजान हा गेल्या अनेक वषार्पासून लोकांना चुना लावण्याचे काम करीत होता. गोड बोलून , आल्लातालाचे गारूड करून भक्तांना आपलस करीत होता. यामुळे महिलांबरोबर पुरूषही त्याच्या तत्वज्ञानाला बळी पडले आहेत. अनेक पुरूषांकडून त्यांने पैसे उकळलेले आहेत. सद्या दोन महिलांनी तक्रार दिली असली तरी अजून बऱ्याच महिला त्याच्या वासनेच्या शिकार झाल्याचा दावा करण्यात येतोय. कळंबोलीत सुद्धा तो भोंदूबाबा महिलांना भेटायला बोलवायचा. समस्या दूर होतील या आशेने मोठ्या संख्येने लोक त्याला भेटायला जात होते. लोकांची वाढती गर्दी पाहून त्याला सोसायटीतून हाकलून दिले. गुन्हे दाखल झाल्यावर भोंदूने कुटंबासह पळ काढला. अब्दुल रशिद उर्फ बाबाजान हा गेल्या अनेक वषार्पासून लोकांना चुना लावत होता. त्याने महिलांसह पुरुषांचीही आर्थिक फसवणूक केली. अब्दुल रशिद उर्फ बाबाजान विरोधात दोन महिलांनी तक्रार दिली आहे. तसेच बऱ्याच महिलांवर भोंदूबाबाने अत्याचार केला असल्याचा दावा करण्यात येत आहे.

## पतीच्या प्रेयसीने वाद, मार्ग काढण्यासाठी महिला भोंदूबाबाकडे

### त्याचे मध्यरात्री विचित्र विधी करत महिलेसोबत अमानुष कृत्य

**■रायगड। प्रतिनिधी,**

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाची धग अद्याप शांत होत नाही तोच रायगड जिल्ह्यात आणखी एक भोंदू बाबाचा अमानुष प्रकार उघडकीस आला आहे. यामुळे रायगडमध्येही खळबळ उडाली आहे. अंधश्रद्धेच्या नावाखाली महिलांवर अत्याचार होत असल्याचे पुन्हा एकदा समोर आल्याने रायगड जिल्हा हादरला आहे. खालापूर तालुक्यात घडलेल्या या घटनेत कळंबोली येथील अब्दुल रशीद उर्फ बाबाजान या भोंदू बाबाने एका विवाहित महिलेची फसवणूक करून तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. सांताक्रूझ येथील पीडित महिला वैवाहिक अडचणींमुळे मानसिक तणावात होती. पतीच्या प्रेयसीमुळे निर्माण झालेल्या वादातून मार्ग काढण्यासाठी ती ओळखीतील या भोंदू बाबाकडे गेली होती.

'उपचार' करण्याचे आमिष दाखवत आरोपीने तिचा विश्वास संपादन केला. प्रथम तिला माहेरी बोलावून घेतल्यानंतर खालापूर तालुक्यातील महड परिसरात नेले. तिथे मध्यरात्री जादूटोण्याच्या नावाखाली विचित्र विधी करत महिलेवर अमानुष कृत्य केल्याचे समोर आले आहे. काही काळानंतर कोणताही परिणाम न झाल्याने आणि स्वतःची फसवणूक झाल्याची जाणीव झाल्यावर पीडित महिलेने पोलिसांकडे धाव घेतली.

या घटनेमुळे 'एक संपत नाही तोच दुसरा' अशा प्रकारे भोंदूगिरीचे प्रकार समोर येत असल्याने नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण आहे. अशोक खरात प्रकरणानंतरही अशा घटना घडत असल्याने अंधश्रद्धेविरोधातील कारवाई अधिक कठोर करण्याची मागणी होत आहे. रायगडमध्ये भोंदूगिरी थांबण्याचे नाव घेत नसल्याने प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. नागरिकांनी अशा भोंदू बाबांच्या आमिषांना बळी न पडता सतर्क राहावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

**पोलिसांनी आरोपीला ठोकल्या बेड्या**

तक्रारीनंतर खालापूर पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. रायगड पोलीस अधीक्षक आचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल यांच्या सूचनेनुसार पोलिसांनी आरोपीला कळंबोली येथून अटक केली. त्याला न्यायालयात हजर करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.



# संपादकीय


संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## महाराष्ट्राचा कर्मदरिद्रीपणा!

राज्यातील नद्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने अखेर 'महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण'ची स्थापना केली आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने वर्ष २०२५ मध्ये सादर केलेल्या अहवालात महाराष्ट्रातील १० प्रमुख नद्यांमध्ये प्रदूषणाचे ५४ पट्टे आढळले आहेत. या अहवालानुसार मिठी, मुठा, मुळा, भीमा या नद्या अतीप्रदूषित म्हणून नोंदवल्या गेल्या. विकासकामे आणि गुंतवणूक यांमध्ये महाराष्ट्र आघाडीवर आहे, हे आपण भूषण म्हणून सांगतो, त्याप्रमाणे नद्यांच्या प्रदूषणामध्येही पहिल्या क्रमांकावर असणे, ही राज्याची नाचक्की आहे. ही स्थिती काही आजची नाही. मागील काही वर्षांपासून नद्यांच्या प्रदूषणाचा प्रश्न महाराष्ट्रात अतीगंभीर झाला आहे. वर्ष २०१८ मध्येही महाराष्ट्रात नद्यांच्या प्रदूषणाचे ५३ पट्टे होते. ही गंभीर स्थिती लक्षात घेऊन 'राष्ट्रीय हरित लवादा'ने नद्यांमधील प्रदूषण रोखण्यासाठी आणि नद्यांचे पुनरुज्जीवन व्हावे, यांसाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका सादर केली. या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने कानउघाडणी केल्यावर महाराष्ट्र सरकारने या प्राधिकरणाची स्थापना केली. महाराष्ट्रासाठी हे भूषणावह नाही. एवढा सर्व प्रकार झाल्यानंतरही वर्ष २०२६ पर्यंत महाराष्ट्रातील नद्यांच्या स्थितीमध्ये काही फारशी सुधारणा झालेली नाही. मुळात राज्यातील नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळासारखी सक्षम यंत्रणा कार्यरत आहे. राज्यातील नद्यांची इतकी दयनीय स्थिती होईपर्यंत हे मंडळ काय झोपा काढत होते का? आता प्राधिकरण स्थापन झाल्यावर त्याच्या माध्यमातून नद्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून २ सहस्र कोटी रुपये निधी उभारण्यात येणार आहे; परंतु यापूर्वी प्रदूषण नियंत्रणासाठी सरकारने जो कोट्यवधी रुपयांचा निधी व्यय केला. तो कुठे गेला? राज्यांतील नद्यांची इतकी दयनीय स्थिती होईपर्यंत प्रदूषण नियंत्रण मंडळाने ते का रोखले नाही? याची खरेतर चौकशी व्हायला हवी. नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा स्थापन करून काम जलद गतीने करण्यासाठी प्रयत्न करणे, हे चांगले आहे; परंतु जल, वायू आणि ध्वनी प्रदूषणासाठी राज्याची स्वतंत्र यंत्रणा असतांना अन्य एक प्राधिकरण स्थापन करण्याची वेळ का आली? याचा अभ्यास व्हायलाच हवा. सद्यःस्थितीत नद्यांचा उपयोग कचराकुंड्यांप्रमाणे होत आहे. अनेक नद्यांमध्ये पशूवधगृहांचे रक्तमिश्रित पाणी, घराघरांतील सांडपाणी आणि कारखान्यांचे रसायनयुक्त पाणी सोडले जाते. मुंबईतील मिठी नदी पाहिली, तर नदी आहे कि गटार, हेही समजत नाही, अशी दुःस्थिती आहे. प्रतिवर्षी कोट्यवधी रुपये व्यय करून या नदीतील गाळ काढणे आणि गाळ काढण्याच्या नावाखाली आर्थिक मलिदा लाटणे एवढाच सोपस्कार मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून होत आहे. या नदीच्या काठावर असलेल्या तबेल्यांतील मेलेल्या गुरांची धडेही या नदीत टाकली जातात. कचरा, प्लास्टिक, घरे-कारखाने यांतील टाकाऊ साहित्य, थर्मोकॉल, पशूवधगृहातील अवशेष आदी कचरा या नदीत टाकल्यामुळे ही नदी मृतवत झाली आहे. महाराष्ट्रातील अनेक नद्यांची स्थितीही अशीच आहे. पंढरपुरात श्री विठ्ठलाचे दर्शन घेण्याआधी चंद्रभागेचे दर्शन घेण्याची प्रथा आहे. अनेक संतांचा पदस्पर्श झाल्याने चंद्रभागेची आध्यात्मिक महतीही मोठी आहे. अशा तीर्थाचेही प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि सरकार संगोपन करू शकले नाही, तेथे अन्य नद्यांची स्थिती काय असेल, हे लक्षात घ्या. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्यासारख्या थोर संतपरंपरेची साक्षीदार असलेल्या इंद्रायणी नदीच्या प्रदूषणाचा विषय तर विधीमंडळाच्या प्रत्येक अधिवेशनामध्ये चर्चेला येतो. अशा नद्यांची गटाराप्रमाणे स्थिती होते, हे महाराष्ट्राच्या कर्मदरिद्रीपणाचे लक्षण आहे. या पवित्र नद्या मरणासन्न स्थितीपर्यंत पोचणे, हे महाराष्ट्राचे पाप आहे. त्यामुळे भविष्यात नद्यांचे पुनरुज्जीवन आणि संवर्धनाचे काम प्रामाणिकपणे करून महाराष्ट्राचे पापक्षालन करावे. महाराष्ट्रात नद्यांच्या स्वच्छतेसाठी प्रयत्नच झाले नाहीत, असे नाही. गंगा नदीच्या स्वच्छतेच्या पार्श्वभूमीवर वर्ष २०१७ मध्ये महाराष्ट्र सरकारने चंद्रभागेच्या स्वच्छतेसाठी 'नमामि चंद्रभागा' उपक्रमाची घोषणा केली; परंतु ९ वर्षांनंतरही ही योजना म्हणावी तशी पुढे सरकलीच नाही. चंद्रभागेच्या स्वच्छतेसाठी पंढरपूर आणि पुणे येथील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये चंद्रभागेच्या स्वच्छतेसाठीच्या उपाययोजना विभागून घेण्यात आल्या. सांडपाण्याचे व्यवस्थापन, रासायनिक पाणी सोडणाऱ्या कारखान्यांवर कारवाई, जलशुद्धीकरण प्रकल्पांची निर्मिती, नदीमध्ये केल्या जाणाऱ्या धार्मिक विधींचे सुनियोजन आदी विविध स्तरांवर ही मोहीम राबवणे आवश्यक होते. या योजनेसाठी यंत्रणा निर्माण करण्यात आली आणि निधीही संमत करण्यात आला; परंतु सुनियोजन आणि समन्वयाचा अभाव यांमुळे ही योजना बारगळली. इंद्रायणी नदीमध्ये रासायनिक द्रव्ये सोडणाऱ्या कारखानदारांवर कारवाई करण्यात प्रशासन अपयशी ठरले. मुळात या सर्वांकडे लक्ष देण्याचे दायित्व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे होते; परंतु शेतातील बुजगावण्याप्रमाणे या मंडळाची निष्क्रीयता महाराष्ट्राला भोगावी लागत आहे. या मंडळाची निष्क्रीयता, प्रशासनाचे दुर्लक्ष यांसह नागरिकांची असंवेदनशीलताही नद्यांच्या प्रदूषणाला मोठ्या प्रमाणात कारणीभूत आहे. चंद्रभागा नदीची स्थिती पाहिली, तर त्या ठिकाणी येणारे भाविक नदीची पवित्रता टिकवण्यासाठी काळजी घेतांना दिसत नाहीत आणि तेथील मंदिर प्रशासन अन् स्थानिक स्वराज्य संस्था याही भाविकांना शिस्त लावण्यासाठी पुढाकार घेत नाहीत. त्यामुळे राज्यातील नद्या प्रदूषणमुक्त करायच्या असतील, तर सरकारची इच्छाशक्ती, प्रदूषणाला कारणीभूत असलेल्यांवर कठोर कारवाई, जलशुद्धीकरण प्रकल्प आणि नागरिकांमध्ये जनजागृती या सर्व स्तरांवर काम करावे लागेल. मनुष्याच्या जन्मापासून त्याच्या मरणापर्यंतच्या प्रत्येक सुख-दुःखात नदीचे योगदान अतुलनीय आहे. एका वाक्यात सांगायचे झाले, तर 'नदी ही मनुष्याची जीवनवाहिनी आहे.' म्हणूनच पाण्याला 'जीवन' हा शब्द यथायोग्य आहे; परंतु नैसर्गिक साधनसामग्रीवर अधिराज्य निर्माण करतांना मनुष्याने जंगल, डोंगर, समुद्र यांसह नद्यांचेच जीवन धोक्यात आणले आहे. एक काळ असा होता की, वाटसरूही नद्यांच्या पाण्याने स्वतःची तहान भागवत होते; परंतु ही कल्पनाच आता स्वप्नवत् झाली आहे. भावी पिढीला निर्मल आणि स्वच्छ जलाच्या नद्या पहायलाही मिळणार नाहीत. हिंदु संस्कृतीमध्ये नद्यांना 'माता' मानले जाते. गंगा, यमुना, सरस्वती, गोदावरी, नर्मदा, कावेरी, चंद्रभागा, इंद्रायणी या नद्यांच्या नावानेच हिंदूंच्या मनात मातृत्वाची भावना निर्माण होते. नद्यांविषयी असलेल्या या पवित्र भावनेमुळे भारतात इतकी वर्षे नद्यांची निर्मलता आणि पवित्रता राखली गेली. त्यामुळे भविष्यकाळात नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी प्रशासकीय स्तरावरील कारवाईसह नद्यांच्या संवर्धनासाठी हिंदु संस्कृतीचे पुनरुत्थापन यांचा संयोग आवश्यक आहे.

# विकासाचे हे नेमके कुठले प्रारूप आहे?

दिल्लीची किंवा उत्तर भारताची सकाळ आता धुक्यासाठी नव्हे, तर धुरक्यासाठी ओळखली जाते, हे आपण अनेक वर्षांपासून पाहत आहोत. पण खरी भीतीदायक गोष्ट म्हणजे या प्राणघातक वास्तवाची आपल्याला सवय होत चालली आहे. 'आज हवा कशी आहे?' हा प्रश्न आता केवळ हवामानाचा राहिलेला नाही; तो थेट आपल्या आरोग्याशी आणि जगण्याशी जोडला गेला आहे. शाळेत जाणाऱ्या मुलांच्या पाठीवर दप्तराबरोबर मास्कही असतो, सकाळची धाव घेणारे लोक आता मोबाइलवर एअर क्वालिटी इंडेक्स (एक्यूआय) म्हणजे हवेच्या गुणवत्तेचा निदेर्शांक ( प्रदूषण पातळी ) पाहूनच बाहेर पडतात. 'स्वच्छ हवा' ही गोष्ट हळूहळू एक विशेषाधिकार होत चालली आहे, असे हे चित्र आहे.



सन २०२५च्या 'वर्ल्ड एअर क्वालिटी रिपोर्ट'नुसार भारत जगातील सहाव्या क्रमांकाचा प्रदूषित देश आहे. आपली सरासरी पीएम २.५ पातळी जागतिक आरोग्य संघटनेच्या सुरक्षित मयार्देपेक्षा जवळपास दहापट अधिक आहे. शेजारील बांगलादेश आणि पाकिस्तान या यादीत आपल्यापेक्षा वर आहेत, याचे समाधान मानण्यात काही अर्थ नाही. एकीकडे आपण '५ ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी'ची स्वप्ने पाहतो, जागतिक स्तरावर स्पर्धा करण्याचा दावा करतो; आणि दुसरीकडे मूलभूत स्वच्छ हवा मिळवण्यासाठीही आपण संघर्ष करत आहोत. हा विरोधाभास केवळ आर्थिक नाही; तो नैतिक आहे. विकासाची व्याख्या आपण केवळ सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) पर्यंत मर्यादित ठेवली, तर हवा, पाणी, आरोग्य यांसारख्या मूलभूत गोष्टी नकळत बाजूला पडतात. अर्थव्यवस्थेत आपण युरोप-अमेरिकेशी स्पर्धा करायची स्वप्ने पाहतो, पण हवा खराब करण्याच्या बाबतीत आपण बांगलादेश आणि पाकिस्तान यांच्याशी खांद्याला खांदा लावून उभे आहोत. जणू काही 'कोणाची हवा जास्त वाईट' अशी नवी शर्यतच लागली आहे. जीडीपीमध्ये 'टॉप-५'मध्ये जायचे आहे, पण एक्यूआयमध्येही 'टॉप-१०'मध्ये राहायचे... हे विकासाचे नेमके कुठले प्रारूप आहे?

वायूप्रदूषण आणि हवामान बदल हे वेगळे विषय नाहीत. पीएम२.५ आणि पीएम१० यांसारखे सूक्ष्म कण आणि ब्लॅक कार्बन केवळ आपल्या फुफ्फुसांवर परिणाम करत नाहीत, तर हिमालयातील बर्फ वितळण्याच्या प्रक्रियेलाही गती देतात. हिमनद्या प्रचंड वेगाने मागे सरकत आहेत. याचा परिणाम केवळ हिमालयापुरता मर्यादित राहत नाही; तो इतर नद्यांच्या प्रवाहावर, शेतीवर आणि शेवटी अन्नसुरक्षेवरही होतो. उष्णतेच्या लाटा वाढल्या की ओझोन प्रदूषण वाढते, पावसाच्या बदलत्या पॅटर्नमुळे धूळ, दुष्काळ आणि वणव्यांची शक्यता वाढते. म्हणजेच, आज आपण जी हवा श्वासात घेतो, तीच पुढील हवामान संकटाला आकार देत आहे.

भारताच्या उत्तर भागातील भौगोलिक रचना देखील या समस्येला कारणीभूत ठरते. इंडो-गँगेटिक मैदानात हिवाळ्यात तापमानाची उलट स्थिती निर्माण होते, वाऱ्याचा वेग कमी असतो आणि त्यामुळे प्रदूषक खालच्या थरात अडकून राहतात. ही एक नैसर्गिक मयार्दा आहे; पण त्यात मानवनिर्मित घटकांनी भर घातली आहे. शहरांची वाढ वेगाने झाली, पण नियोजन मागे राहिले. रस्ते रुंद झाले, पण सार्वजनिक वाहतूक तितकी प्रभावी झाली नाही. वाहनांची संख्या वाढली, पण त्यातून निर्माण होणाऱ्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याची यंत्रणा पुरेशी बळकट झाली नाही. बांधकामे वाढली, पण धूळ नियंत्रणाचे नियम कागदावरच राहिले. परिणामी, निसर्ग आणि मानवी चुकांची एकत्रित बेरीज म्हणून आजची परिस्थिती निर्माण झाली. प्रदूषणाचा प्रश्न केवळ हवेपुरता मर्यादित नाही, तो आरोग्य व्यवस्थेवर थेट परिणाम करतो. दमा, फुफ्फुसांचे आजार, हृदयविकार, स्ट्रोक हे सर्व प्रदूषणाशी निगडित आहेत. लहान मुलांच्या फुफ्फुसांच्या विकासावर त्याचा परिणाम होतो, वृद्धांना तो अधिक धोकादायक ठरतो. आरोग्य व्यवस्थेवरचा ताण वाढतो, कामकाजाचे दिवस कमी होतात, उत्पादकता घटते. म्हणजेच, प्रदूषण ही केवळ पर्यावरणीय समस्या नसून ती आर्थिक नुकसानाचाही मोठा घटक आहे.

या सगळ्यात एक नवा, किंचित विडंबनात्मक पण अस्वस्थ करणारा बदल दिसू लागला आहे. मी स्वतःही आजकाल कुठेही बाहेर पडताना किंवा प्रवासाचे नियोजन करताना सर्वप्रथम एक्यूआय तपासतो. हॉटेल, वाहतूक, पर्यटनस्थळ यांच्याइतकीच ह्यतिथली हवा कशी आहे?ह्न ही माहिती महत्त्वाची वाटू लागली आहे. काही वर्षापूर्वीपर्यंत आपण अशा प्रकारे कधीच एक्यूआय तपासत नव्हतो. हवा हा एक 'गृहीत' धरलेला घटक होता. तो वेगळा तपासण्याची गरजच वाटत नव्हती. पण आज परिस्थिती बदलली आहे. ज्या शहरात आपण काही दिवस राहणार आहोत, तिथली हवा आपल्या आरोग्यावर तात्काळ परिणाम करू शकते, हे लक्षात घेणे आता आवश्यक झाले आहे. त्यामुळे प्रवास करताना एक्यूआय तपासणे, अधिक प्रदूषित वेळा टाळणे, आवश्यक असल्यास काळजी घेणे या सवयी लावून घेणे गरजेचे आहे. हवा किती 'वाईट' आहे, ते मोबाइलवरील ॲप आपल्याला दर तासाला सांगतात. एक्यूआय तपासणे ही केवळ सवय नाही, तर आजच्या काळात एक गरज झाली आहे. पण त्याच वेळी ती एक इशाराही आहे. कारण ज्या समाजात 'स्वच्छ हवा' ही गोष्ट आधी तपासावी लागते, तो समाज काहीतरी मूलभूत गमावत आहे.

या संदर्भात सरकारकडून काही प्रयत्न झाले आहेत. राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम, बीएस-६ मानके... पण त्यांचे परिणाम फारसे दिसत नाहीत. कारण ही उद्दिष्टे बंधनकारक नाहीत आणि त्याबाबतच्या अंमलबजावणीत सातत्य दिसत नाही. विविध विभागांमध्ये समन्वयाचा अभाव आहे, आणि शहरांवर लक्ष केंद्रित करताना ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष होते. घरगुती इंधन, लाकूड, कोळसा यांचा वापर अजूनही मोठ्या प्रमाणावर होतो, जो एक मोठा प्रदूषण स्रोत आहे. पण या घटकांवर गंभीरपणे काम करण्याऐवजी, लक्ष बहुतेक वेळा केवळ शहरांतील वाहतूक किंवा पराली जाळण्यावर केंद्रित केले जाते.

याहूनही गंभीर गोष्ट म्हणजे वायूप्रदूषणाचा प्रश्न अजूनही राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आलेला नाही. निवडणुकीत तो निर्णायक मुद्दा ठरत नाही. परिस्थिती गंभीर झाल्यावर तात्पुरते उपाय केले जातात... कधी सम-विषम, कधी कृत्रिम पाऊस, कधी स्मॉग टॉवर्स. पण या उपाययोजनांमुळे मूळ प्रश्न सुटत नाही. शेतकऱ्यांवर, शेजारी राज्यांवर, किंवा हवामानावर... अशी जबाबदारी ढकलली जाते. या सगळ्या टोलवाटोलवीत सामान्य माणूस मात्र रोजच्या रोज प्रदूषित हवा श्वासात घेत राहतो. यात दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि आम आदमी पार्टीच्या नेत्या आतिशी मारलेना यांसारख्या नेतृत्वाकडून कधीकधी अशी विधाने ऐकायला मिळतात की त्यावर रडावे की हसावे, हा प्रश्न पडतो. उदाहरणार्थ, एक्यूआयला तापमानासारखा एक आकडा मानून तो कोणत्याही साधनाने मोजता येतो, असे सहजपणे सांगितले जाते. जणू काही एक्यूआय ही गुंतागुंतीची वैज्ञानिक पद्धती नसून, थमार्मीटरने तपासता येणारी साधी गोष्ट आहे! कधी परिस्थिती गंभीर असतानाही 'स्थिती नियंत्रणात आहे' असे सांगितले जाते, तर कधी सर्व दोष हवामानावर ढकलला जातो. अशा प्रकारच्या विधानांमुळे समस्या समजून घेण्याऐवजी तिचे हलकेकरण होते आणि शेवटी सर्वसामान्य नागरिकांच्या मनात संभ्रम आणि अविश्वासच वाढतो.

जगात काही देशांनी वेगळा मार्ग निवडला आहे. नॉर्वे, फिनलंड, स्वीडन, आइसलँडसारख्या देशांमध्ये स्वच्छ हवा ही केवळ घोषणा नाही, तर धोरणात्मक प्राधान्य आहे. तिथे ऊर्जा मोठ्या प्रमाणावर नूतनीकरणक्षम स्रोतांमधून येते, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बळकट आहे, शहरांची रचना माणसाच्या आरोग्याला केंद्रस्थानी ठेवून केली जाते. तेथे नियम केवळ तयार केले जात नाहीत; ते काटेकोरपणे अंमलात आणले जातात. नागरिकही त्यात सक्रियपणे सहभागी होतात. त्यामुळेच तिथे हवा स्वच्छ आहे ती योगायोगाने नव्हे, तर नियोजन आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे.

आपल्याकडे मात्र आपण अजूनही तात्पुरत्या उपायांवर समाधानी होतो. पाऊस पडला की प्रदूषण कमी होते, वारा सुटला की हवा स्वच्छ होते आणि आपण सुटकेचा निःश्वास टाकतो. पण हा तात्पुरता दिलासा आहे. दीर्घकालीन उपायांसाठी कठीण निर्णय घ्यावे लागतात. ऊर्जा क्षेत्रात बदल, उद्योगांवर नियंत्रण, वाहतूक व्यवस्थेचा पुनर्विचार, शहरांचे नव्याने नियोजन असे बरेच. हे निर्णय राजकीयदृष्ट्या कठीण असतात; पण ते टाळत राहिलो, तर किंमत अधिकच मोजावी लागेल. यात नागरिकांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. आपण स्वतः किती वेळा प्रदूषणाच्या प्रश्नाला गांभीर्याने घेतो? वाहनांचा वापर कमी करणे, सार्वजनिक वाहतूक वापरणे, कचरा न जाळणे, स्थानिक पातळीवर आवाज उठवणे या गोष्टी छोट्या वाटतात, पण त्यांचा एकत्रित परिणाम मोठा असतो. अर्थात, शासनही प्रामाणिकपणे काम करत आहे, असा विश्वास जेव्हा नागरिकांना वाटतो तेव्हाच त्यांचा सहभाग वाढतो.

स्वच्छ हवा ही कुणाच्या चैनीची गोष्ट नाही; ती जगण्यासाठी आवश्यक आहे. वायूप्रदूषण ही आता केवळ पर्यावरणाची समस्या राहिलेली नाही; ती सार्वजनिक आरोग्य, अर्थव्यवस्था आणि सामाजिक न्यायाशी जोडलेली आहे. शहरात राहणाऱ्या आणि खेड्यात राहणाऱ्या माणसाला, श्रीमंत आणि गरीबाला, लहान मुलाला आणि वृद्धाला... सर्वांना तिचा फटका बसतो. फरक इतकाच की काही जण स्वतःला वाचवण्यासाठी साधने विकत घेऊ शकतात, तर काही जण तेही करू शकत नाहीत.

आपण जगात कितव्या क्रमांकावर आहोत हा मुद्दा गौण आहे. खरा प्रश्न असा आहे की, आपण आपल्या लोकांसाठी स्वच्छ हवा देण्याला किती महत्त्व देतो. विकासाच्या व्याख्येत आपण श्वासाचा समावेश करणार आहोत का, की तो अजूनही 'दिसत नाही' म्हणून दुर्लक्षित राहणार आहे? हा प्रश्न आता पुढे ढकलण्याइतका लहान राहिलेला नाही. आता तरी आपण तो थेट, प्रामाणिकपणे आणि ठोसपणे हाताळणार आहोत का? याचे उत्तरच आपल्या पुढील पिढ्यांचा श्वास ठरवणार आहे.

## बेमोसमीचा तडाखा

अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण यांच्यातील लांबलेल्या युद्धामुळे सगळ्यांनाच अडचणींना तोंड द्यावे लागत असताना, बेमोसमी पावसानेही अचानक हल्ला केल्याने शेतकऱ्यांसह सामान्यही चिंताक्रांत होणे साहजिकच. असे संकट शेतीपुरते कधी नसतेच. कृषीआधारित अर्थव्यवस्थेतील प्रत्येक घटकालाच त्याची किंमत मोजावी लागते. हवामान विभागाने या अवकाळी सरींचा इशारा आधीच दिला खरा; परंतु त्या इतक्या विक्रमी स्वरूपात कोसळतील, असे कुणाच्या ध्यानीमनी नव्हते. गेले दोन-तीन दिवस पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, कोकण असा कोणताच भाग या तडाख्यातून सुटू शकला नाही. तशी मार्चच्या मध्यापासूनच राज्याच्या कोणत्या ना कोणत्या भागात पाऊस व गारपीट सुरू होती. मात्र, त्याच्या विक्रमाने पुणे-नाशिकसारखी शहरे ऐन उन्हाळ्यात तुंबवली. तेथील जनजीवन झोडपून काढल्यानंतर या संकटाच्या तीव्रतेचा अंदाज अनेकांना आला. पुण्यात एप्रिलमधील कोसळधारेचा १३० वर्षांचा विक्रम काही तासांत मोडीत निघाला, तर नाशिकमध्ये दोन तासांत ४० मिलीमीटर पाऊस झाल्याने खोदून पडलेल्या शहरातून मार्गक्रमण करताना नागरिकांची धांदल उडाली. या आपत्तीने सर्वाधिक होरपळ झाली शेतशिवाराची. राज्यात सुमारे सव्वा लाख हेक्टरवर शेतपिकांचे नुकसान झाल्याचे सरकारी आकडेवारी सांगते. प्रत्यक्षात या दोन दिवसांतील हानीची गणती अद्याप बाकी असल्याने हा आकडा अडीच लाख हेक्टरच्याही पुढे जाईल. आंबा, केळी, द्राक्ष, कांदा, हरभरा, गहू, संत्री, उन्हाळी भाजीपाला अशी हरेक पिके पावसाच्या तावडीत सापडून शेतकऱ्याची स्वप्नेच धुळीस मिळाली, ज्याचे परिणाम काहींच दिवसांत टंचाई, महागाईच्या स्वरूपात दिसतील. दुर्दैवाने भारतात तेवढे गांभीर्य दिसत नाही. हवामानाचे लाल-पिवळे 'अलर्ट' मिळत असले तरी त्यांच्या अचूकतेचा मुद्दा आहेच. वास्तविक शेती व शेतकरी जितका लवकर संकटांतून बाहेर पडणे प्रत्येकाच्या हिताचे आहे, याची खूणगाठ बांधून आवश्यक ती बांधबंदिस्ती करायला हवी. रास्त दर, सोयी-सवलती, नुकसानभरपाई आदी गरजेचे आहेच; परंतु त्या जोडीला आधुनिक तंत्रज्ञानाच्या साथीने अस्मानी संकटांची तीव्रता नक्कीच कमी करता येऊ शकते.

## मायावी माओवाद्यांचा धोका!



केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लोकसभेत जाहीर केले की, 'माओवादी समस्या संपली आहे.' जंगलातील वेडपट हिंसाचाराची निरर्थकता लक्षात आल्यामुळे माओवादी आता शहरी भागात संघर्ष उभा करण्याची शक्यता नाकारता येत नाही. शहरी भागात एक 'मायावी युद्ध' सुरू होण्याचा धोका आता निर्माण झाला आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लोकसभेत जाहीर केले की, 'माओवादी समस्या संपली आहे.' दशकभरापूर्वी अशक्यप्राय वाटणारी कामगिरी यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल सरकार आणि सुरक्षा दले यांचे मनःपूर्वक अभिनंदन! खंबीर नेतृत्व, प्रचंड राजकीय इच्छाशक्ती आणि सुरक्षा दलाचे अपार कष्ट आणि अतुलनीय साहस यांमुळेच हे शक्य झाले आहे. त्यामुळे या सर्वांचे मनापासून अभिनंदन करणे आवश्यक आहे. माओवाद्यांनी हजारो निष्पाप नागरिक, सुरक्षाकर्मी, आमदार, खासदार, मंत्री, गृहमंत्री अशा असंख्य व्यक्तींना ठार मारलेले आहे. दोन-तीन पिढ्यांपासून माओवादग्रस्त भागातील जनता दहशतीत जगत होती. आता हे लोक मोकळेपणाने आयुष्य जगतील.

उत्तरेतील पशुपतीपासून दक्षिणेतील तिरुपतीपर्यंत पसरलेला विस्तीर्ण माओवादी रेड कॉरिडॉर, हजारो कोटींची वार्षिक कमाई, गनिमी युद्धात तरबेज असलेली दहा हजारांपेक्षा जास्त संख्येतील एक प्रशिक्षित, अनुभवी खडी फौज (पीएलजीए), जंगलातील पीएलजीएला मदत करण्यासाठी शहरी भागात उभ्या केलेल्या शेकडो फ्रंट संघटना आणि त्यांच्याआडून काम करणारे लाखो समर्थक, उच्चविद्याविभूषित विद्वानांपासून अगदी दुर्गम भागातील निरक्षर आदिवासींपर्यंत उभी केलेली कार्यकर्त्यांची एक अभेद्य फळी... दहा-पंधरा वर्षांपूर्वीच्या या भीषण परिस्थितीचा विचार केला तर देशातून माओवादी हिंसाचाराचे निर्मूलन होईल याची कोणी स्वप्नातही कल्पना केली नव्हती.

येत्या काळात माओवादी प्रभावक्षेत्रातील हिंसाचार बंद होईल. रस्ते, पूल, शाळा, कॉलेज, दवाखाने, व्यापार, उद्योगधंदे, शिक्षण, नोकऱ्या यापासून वंचित ठेवलेले कोट्यवधी लोक आता विकासाकडे वाटचाल करतील. कुऱ्हाडीने हात, पाय, मुंडके छाटून टाकणे किंवा या कानापासून त्या कानापर्यंत गळा कापून माओवाद्यांनी ज्या हजारो निष्पाप लोकांच्या हत्या केल्या आहेत, तो मनोविकृत हिंसाचार आता थांबला आहे. तीन पिढ्यांपासून सतत मृत्यूच्या सावटाखाली कसेबसे जीवन जगणारे कोट्यवधी सामान्य नागरिक आता भयमुक्त झाले आहेत.

अगदी १९६७च्या नक्षलबारी आंदोलनाच्याही आधीपासून आजपर्यंत माओवाद्यांनी आदिवासींना फक्त 'वापरून' घेतले आहे. माओवादी आणि सुरक्षा दले यांच्या संघर्षात नेहमीच आदिवासींना पुढे केले गेले आणि त्यामुळे असंख्य आदिवासी मारले गेलेत. आता जेव्हा गैरआदिवासी माओवादी नेत्यांवर मरण्याची वेळ आली, तेव्हा मात्र त्यांनी पटकन शस्त्र टाकून शरणागती पत्करत स्वतःचा जीव वाचवला आहे. आता ही बाब संपूर्ण समाजाच्या लक्षात आलेली आहे. शरण आलेल्या या लोकांचे हात हजारो निष्पाप आदिवासींच्या रक्ताने माखलेले आहेत, हे आपला समाज कधीच विसरणार नाही. माओवाद्यांच्या हातून मारल्या गेलेल्या असंख्य लोकांच्या पीडित कुटुंबीयांना कधी आणि कोणता न्याय मिळेल, हा एक अनुत्तरित प्रश्नच आहे.

तिभागा आंदोलन, तेलंगण आंदोलन, श्रीकाकुलम आंदोलन, गोपीबल्लभपूर आंदोलन, नक्षलबारी आंदोलन, आंध्र प्रदेशातील पीडब्ल्यूजी, बिहारमधील एमसीसी आणि नंतर त्यांचे विलीनीकरण होऊन तयार झालेला सीपीआय (माओवादी) पक्ष असा हा साम्यवादी प्रवास आहे. या हिंसक साम्यवादी आंदोलनांना समाजातून समर्थन मिळण्यामागे एक महत्त्वाचे कारण होते. पूर्वी जमीनदारी-सावकारी व्यवस्था अस्तित्वात होती. ही व्यवस्थाच मुळी विषमता, अन्याय आणि शोषणावर आधारित होती. गावातील एका कुटुंबाकडे हजारो एकर जमीन राहणार आणि त्याच गावातील इतर हजारो कुटुंब अर्धपोटी राहणार अशी स्थिती असेल तर त्याचा उद्रेक होतोच. शेवटी तेच घडले.

उपाशी, अर्धपोटी भूमिहीन शेतमजुरांनी जमीनदारांच्या घरावर हल्ले केले. त्यांना ठार मारून त्यांच्या जमिनी आपल्या ताब्यात घेतल्या. हिंसाचाराचा हा वणवा सर्वत्र पसरला होता. याच रक्तलांच्छित पार्श्वभूमीवर तेलंगणातील पोचमपल्ली येथून आचार्य विनोबा भावे यांनी आपली प्रसिद्ध भूदान चळवळ सुरू केली होती. मरणाच्या भीतीने अनेक जमीनदारांनी पटापट जमीन दान केली आणि आपला जीव वाचवला. सरकारनेदेखील जमीन सुधारणा कायदे (सिलिंग) करून सामाजिक परिस्थितीत बदल घडवून आणला. समाजातील विविध घटकांच्या संतुलित विकास होईल याची जबाबदारी सरकारची असते. न्यायपूर्ण आणि शोषणविरहित समाजव्यवस्था असणे आवश्यक आहे अन्यथा अराजक निर्माण होते.

कामगारांची हुकूमशाही आणि भांडवलदारांची मनमानी या दोन टोकांमधून एक 'मध्यममार्ग' काढणे ही कसरत सरकारला करावी लागेल. एकाची हुकूमशाही आणि दुसऱ्याची मनमानी चालू दिली जाणार नाही, याचे भान सरकारला ठेवावे लागेल. सर्वच समाजघटकांचा न्यायपूर्ण आणि संतुलित विकास होईल हेच लोकनियुक्त सरकारचे कर्तव्य आहे. आज साम्यवादी हिंसाचार आटोक्यात आलेला असताना भांडवलदार मोकाट सुटणार नाहीत याची काळजी सरकारला घ्यावी लागेल. शासन यंत्रणा लोकाभिमुख आणि संवेदनशील राहून जनतेची कामे करतील याची खबरदारी सरकारला घ्यावी लागेल. निर्दय, भ्रष्ट आणि लुटारू शासन व्यवस्था नक्षलवाद्यांना जन्म देते हा जुना अनुभव विसरता येणार नाही.

सरकारने माओवाद्यांच्या ताब्यातील रेड कॉरिडॉर नष्ट केला आहे. रक्तपिपासू माओवादी लष्कर नेस्तनाबूत केले आहे. त्यांचे वरिष्ठ नेते ठार झाले आहेत आणि उरलेले शरण आले असले तरी, आता 'माओवाद संपला' वा 'माओवादी समस्या संपली', असे म्हणत आनंदाने बेहोश होण्याचे काहीही कारण नाही. ही वेळ अत्यंत सावध राहण्याची आहे. जंगलातील युद्ध संपलेले असले तरी येत्या काळात शहरात एका वेगळ्या प्रकारच्या संघषार्ची सुरुवात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. संघषार्चे फक्त क्षेत्र बदललेले आहे इतकेच. जंगलातून ते काँक्रीटच्या जंगलात स्थलांतरित झालेले आहे.

हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, चार प्रमुख घटक मिळून माओवादी संघटना तयार झालेली आहे. घटक एक, प्रखर विचारधारा. दोन, संघटित पक्ष. तीन, लष्कर आणि चार, फ्रंट संघटनांची संयुक्त आघाडी. या चारपैकी फक्त एकच घटक म्हणजे लष्कर हे आज कमजोर झालेले आहे. उर्वरित तीन घटक आजही अस्तित्वात आहेत. विचारधारा जिवंत ठेवण्यासाठी पक्षाचे वरिष्ठ नेतृत्व सुरक्षित ठेवणे याला माओवादी सर्वोच्च प्राधान्य देतात. वरिष्ठ माओवादी नेता बसवराज ठार झाल्यानंतर मोठ्या नेत्यांची जी शरणागतीची लाट आली, ती याच स्ट्रॅटेजीचा भाग आहे. शरण आल्यामुळे बहुसंख्य वरिष्ठ माओवादी नेते आज जिवंत आहेत आणि सुरक्षित आहेत. शहरातील माओवादी विचारवंत तर आधीपासूनच अहोरात्र कार्यरत आहेत. एकंदरीत पाहता माओवादी नेतृत्वाला फारशी क्षती पोहोचलेली नाही, असे दिसते.

शहरी भागातील त्यांच्या फ्रंट संघटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. जंगलातील वेडपट हिंसाचाराची निरर्थकता लक्षात आल्यामुळे माओवादी आता शहरी भागात संघर्ष उभा करण्याची शक्यता नाकारता येत नाही. शहरी भागातील कार्याबद्दल माओवादी दस्तावेजात स्पष्टपणे दिलेले आहे की, समाजाच्या विविध घटकांमध्ये माओवादी संघटना उभ्या केल्या पाहिजे. या फ्रंट संघटनांचा माओवादी पक्षाशी उघडपणे कोणताही संबंध यायला नको. गुप्तपणे संपर्क ठेवून या असंख्य फ्रंट संघटनांनी माओवादी पक्षाला मदत केली पाहिजे.

समाजातील सर्वच घटकांत फ्रंट संघटना स्थापन करून लक्षावधी जनतेला अप्रत्यक्षपणे माओवादी पक्षाला मदत करण्यासाठी तयार करणे हेच शहरी माओवाद्यांचे काम आहे. 'जनसंघटना' (मास ऑर्गनायझेशन) आणि 'जनआंदोलन' (मास स्ट्रगल) हे शब्द शहरी माओवादी कार्याच्या बाबतीत सतत वापरलेले आहेत. एकदा अशा जनसंघटना तयार झाल्या की, मग योग्य संधी साधून ठिकठिकाणी त्यांचे जनआंदोलन उभे करणे आणि सरकारला गलितगात्र करणे हे माओवाद्यांनी स्वतःच त्यांच्या दस्तऐवजात निसंदिग्ध स्वरूपात लिहिलेले आहे. 'आम्ही शस्त्राचा त्याग केलेला आहे. यापुढे आम्ही जनतेच्या समस्या संविधानाच्या मार्गाने सोडवण्याचा प्रयत्न करू', असे जेव्हा शरण आलेले माओवादी म्हणतात, तेव्हा त्यांच्या मनात नक्की काय शिजते आहे हे जाणकारांना लगेच लक्षात येते.

शहरी माओवादी सभ्यतेचे वेगवेगळे मुखवटे घालून मायावी रूपात समाजात वावरत असतात. जंगल भागातील हिंसक युद्ध संपून आता शहरी भागात एक 'मायावी युद्ध' सुरू होण्याचा धोका निर्माण झाला आहे. सर्वच राजकीय पक्षातील नेते, सुरक्षा यंत्रणा, प्रसार माध्यमातील 'ओपिनियन मेकर' आणि समाजधुरीणांनी यापुढे अत्यंत सावध राहणे गरजेचे आहे.

# हराभरा कबाब

**साहित्य :** २ मोठे कप भरून मटारचे दाणे, १ मोठा उकडलेला बटाटा, ब्रेड क्रम्बस, आमचूर पावडर, मीठ व थोडीशी साखर, २ ते ३ हिरव्या मिरच्या, आले व लसूण.

**कृती :** सगळ्यात पहिले कढईमध्ये तेल घेऊन त्यात मटारचे दाणे टाकले. त्यामध्ये थोडी हळद, मीठ, हिरवी मिरची, आले, लसूण, जिरे जाडसर वाटलेले टाकले. १० ते १५ सेकंद वाफवले. नंतर त्यात आमचूर पावडर आणि साखर टाकले व २ मिनिटे परतून घेतले. त्यानंतर हे मिश्रण थोडे थंड झाल्यावर मिक्सरमध्ये जाडसर भरड काढली. मटारच्या जाडसर भरडमध्ये कुस्करलेला बटाटा ब्रेड क्रम्बस व तोडे चवीपुरते मीठ टाकले. मिश्रण एकत्र केल्यावर गोल टिक्की बनवून तळून घेतले.



# सोन्याने सजवा रेशमी केस



**फॅशनच्या** युगात भूतकाळातल्या गोष्टी आल्या तर त्यात काही नवल नाही. कारण राजा-महाराजांच्या काळात मोठ्या कलाकुसरतेने तयार करण्यात आलेले पेहराव, नक्षीदार दागिने आजच्या आधुनिक युगातील कारागिरांना आकर्षित करत असून, त्यात काही बदल करून एक वेगळी नक्षी तयार केली जाते व तीच बाजारात पुन्हा फॅशनच्या रूपाने येते. त्यापेक्षा वेगळी गोष्ट म्हणजे राजा-महाराजांच्या काळात सोन्याच्या मुलाम्याने केस सजवले जात होते. त्याच नक्षीकडे आजचे कारागीर आकर्षित झालेले दिसतात. फॅशन म्हणजे जुन्या नव्याचे मिश्रणच म्हणता येईल. काळानुसार फॅशनमध्ये बदल झाले आहेत. मात्र त्याच्यामागे भूतकाळ लपला आहे. नव्याने बाजारात असलेल्या हेअर ज्वेलरीवर त्याचा प्रभाव दिसतो. देवदास, जोधा अकबर, हम दिल दे चुके सनम, उमराव जान असे काही चित्रपट आहेत, की त्यात







नायिकेच्या केसांवर अधिक भर दिलेला दिसतो. भारतीय मुघल साम्राज्यातील शैली त्यात वापरलेली दिसते. या दागिन्यांना सामान्य नागरिकांनी देखील पसंती दर्शवली आहे. घागरा, साडी, सलवार-कुर्ता किंवा शर्ट पॅण्टवर देखील हे दागिने परिधान केले जाऊ शकतात. या दागिन्यांमध्ये हिरे, मोती, माणिक यांचे वर्क केले जात असल्याने त्यांच्या वजनानुसार त्यांची किंमत ठरवली जाते. रेश्मी केसांकरिता तयार करण्यात येणारे दागिने शुद्ध सोन्यात केले जातात. मात्र कमी बजेटमध्ये चांदीच्या दागिन्यांवर सोन्याची पॉलिश करून ते खरेदी करता येऊ शकतात.

# आल्याचा ज्यूस आरोग्यासाठी फायदेशीर



- आल्याच्या रसामुळे डायबेटिज कंट्रोल होण्यास मदत होते. यातील अँटी डायबेटिक गुणधर्मामुळे डायबेटिज नियंत्रित राहतो.
- पचनाचा त्रास असल्यास त्यावर आल्याचा रस उत्तम. आल्याच्या रसाने पचन नीट होते.
- कोलेस्ट्रॉल लेव्हल कमी होण्यासाठी आल्याचा रस घेणे फायदेशीर.
- आल्याच्या रसाच्या सेवनाने मुरुमे कमी होतात.
- कफाचा त्रास असल्यास त्यावरही आल्याचा रस उत्तम. पावसात सर्दी-खोकल्याचा त्रास अधिक होतो. त्यामुळे पावसात आल्याचा रस नियमितपणे घेतल्यास सर्दी-खोकल्यापासून बचाव होऊ शकतो.

**पालकांमध्ये आपल्या मुलांना स्वीमिंग शिकवण्याची क्रेझ काही वर्षांपासून अनेक पटीने वाढली आहे. काही पालक आपल्या मुलांना स्वीमिंग शिकवण्याच्या बहाण्याने स्वतःही स्वीमिंग शिकतात. अनेक तज्ज्ञ स्वीमिंगला एका खेळाव्यतिरिक्त व्यायामाचा एक उत्तम पर्याय मानतात. परंतु स्वीमिंग योग्यप्रकारे न केल्यास आरोग्यासाठी नुकसानकारकही ठरू शकते. इंद्रप्रस्थ अपोलो रुग्णालयाचे डिपार्टमेंट ऑफ इंटरनल मेडिसिन सीनियर कन्सलटेंट डॉ. राकेश गुप्ता यांनी याबाबत काही टिप्स दिल्या आहेत.**

# सावधान! मुलांना स्वीमिंग शिकवण्याआधी घ्या ही काळजी

**आरोग्य तपासणी**

मुलांना स्वीमिंगच्या क्लासला पाठवण्याआधी डॉक्टरांकडून मुलाची तपासणी करून घ्या. त्वचेचे संक्रमण, डोळे, नाक, कान, घशाची तपासणी करून घ्या. स्वीमिंग पूलच्या पाण्यात क्लोरिनचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे सर्व इंद्रियांची योग्य ती काळजी घेणे गरजेचे असते.

जर मुलाचे वजन अधिक जास्त किंवा अधिक कमी असल्यास अशा मुलांना डॉक्टरांकडून काही सल्ले देण्यात येतात. त्यामुळे मुलांना स्वीमिंगला टाकण्याआधी डॉक्टरांचा जरूर सल्ला घ्या.

**स्वीमिंग पूलची स्वच्छता**

स्वीमिंग पूलच्या स्वच्छतेवर लक्ष देणे गरजेचे असते. दररोज पूलमध्ये अनेक लोक येत असतात. अशावेळी एखाद्याला त्वचारोग किंवा अन्य काही रोग असल्याचा त्याचा आपल्या मुलालाही धोका होऊ शकतो. त्यामुळे रोज स्वीमिंग पूलचे पाणी बदलले जाते का, स्वच्छ केले जाते का याची चौकशी करा. अनेकदा स्वीमिंग पूल खुल्या जागी असतात. त्यावर छप्पर नसल्यास स्वीमिंग पूलमध्ये पडणाऱ्या धूळ, पावसाचे पाणी तसेच इतर कचऱ्यामुळे संक्रमण होण्याचा धोका असतो.

**लाईफगार्ड**

सर्व स्वीमिंग पूलमध्ये लाईफगार्ड असणे गरजेचे आहे. काही वेळा एखाद्या साधारण पोहणाऱ्या व्यक्तीला लाईफगार्ड म्हणून उभे केले जाते. अशा व्यक्तीकडे आपत्कालीन परिस्थितीत वाचवण्यासाठी कोणतेही प्रशिक्षण नसते. ज्यावेळी स्वीमिंगसाठी येणाऱ्यांची संख्या अधिक असते, त्यावेळी अधिक लाईफगार्ड असणे गरजेचे आहे.

**प्रथमोपचार सुविधा**

सरकारी नियमांनुसार जलतरण तलावात प्रथमोपचार सुविधा आणि इतर सर्व प्राथमिक सुविधा असाव्या. या सुविधा स्वीमिंग पूलच्या जवळ असाव्यात. आपत्कालीन परिस्थितीत व्यक्तीला प्रथम प्राथमिक मदत कक्षात नेणे आवश्यक आहे आणि आवश्यकतेनुसार प्राथमिक मदत दिली गेली पाहिजे.

**प्रशिक्षण आणि प्रशिक्षक**

पाण्यात उडी मारण्याआधी मुलांना अनुभवी कोचद्वारे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. मुलांना पोहण्याचे शिकवण्यावेळी सुरक्षा उपकरणांचा वापर होणे गरजेचे आहे. ग्लासेस, फ्लोटर्स, इयर प्लग, कॅप इत्यादींचा वापर करणे गरजेचे आहे. फ्लोटरमध्ये छोटासाही होल असल्यास त्याची वेळीच दुरुस्ती केली गेली पाहिजे. फ्लोटर्स योग्य नसल्यास पाण्यात मुलांचे संतुलन बिघडण्याचा धोका असतो.

**डिहायड्रेशन**

पाण्यात पोहत असतानाही शरीरात डिहायड्रेशन होत असते. जास्त घाम येतो. त्यामुळे पाणी सोबत ठेवणे गरजेचे आहे.



# उन्हाळ्यात एसी चालवण्याआधी हे काम न केल्यास विजेचे बिल येईल भरमसाट

उन्हाळा सुरू झाला आहे. अनेक घरांत २४ तास पंखे सुरू ठेवावे लागत आहेत. तुमच्या घरात जर एसी असेल तर तो चालवण्याआधी काही गोष्टी जाणून घ्या. आज आम्ही तुम्हाला या ठिकाणी काही खास टिप्स देत आहोत. ज्या तुमच्या वीज बचत करण्यास मदत करू शकतात. तुम्ही जर या टिप्सचा वापर न करता एसी चालवत असाल तर तुमचे वीज बिल जास्त येण्याची शक्यता आहे. नेहमी लोक गरमीत एसी ऑन करतात. परंतु असे करणे चुकीचे आहे. गरमीत एसी सुरू करण्याआधी काही गोष्टी जाणून घेणे खूप गरजेचे आहे. जाणून घ्या डिटेल्स.

घरात एसी असणारे अनेक लोक असे आहेत. जे वर्षभर एसी चालवत नाहीत. परंतु उन्हाळा सुरू झाला की, घरातील एसी अचानक सुरू करतात. परंतु त्याआधी काही गोष्टी जाणून घेत नाही. त्यामुळे महिन्याचे बिल जास्त येते.



**एसी सर्व्हिस करणे आवश्यक**

काही महिन्यापासून बंद पडलेला एसी अचानक तुम्ही जर उन्हाळ्यात सुरू करीत असाल तर काही गोष्टी जाणून घ्यायला हव्यात. एसीला सुरू करण्याआधी त्या एसीची सर्व्हिस करणे खूप आवश्यक आहे. असे केल्याने केवळ गरमीत थंड हवा मिळत नाही तर वेळोवेळी सर्व्हिसिंग केल्याने तुमच्या एसीची लाइफसुद्धा वाढते. जर तुम्ही विना सर्व्हिस एसी सुरू ठेवत असाल तर तुमची खोली एसीने थंड होईल, पण महिन्याला विजेचे बिल भरमसाट येऊ शकते.

**एसी गॅस संबंधी हे काम करणे आवश्यक**

जितकी आवश्यक एसी सर्व्हिस आहे. तितकेच आवश्यक एअर कंडिशनरमधील गॅस चेक करणे आहे. उन्हाळा सुरू होण्याआधी विनागॅस चेक करता एसी सुरू केला तर होऊ शकते की, तासभर एसी चालवल्यानंतर तुम्हाला थंड एसी मिळणार नाही. कूलिंग कमी होऊ शकते. कारण कम्प्रेसरवर दबाव वाढतो. यामुळे तुमचा एसी खराब होऊ शकतो. तुम्हाला हा एसी दुरुस्त करण्यासाठी मोठी रक्कमसुद्धा मोजावी लागू शकते.

# गुणकारी दुधीभोपळा

भोपळा ही अनेकांची नावडती भाजी, भरीत, कोशिंबीर, सूप असे पदार्थ भोपळ्यपासून बनवले जातात. कितीही नावडता असला तरी गुणधर्मामुळे थोड्या प्रमाणात का होईना, परंतु प्रत्येकाने भोपळा खायलाच हवा. चेहऱ्यावर पडणाऱ्या सुरकुत्यांपासून पोटाच्या गंभीर विकारांवर भोपळा गुणकारी ठरू शकतो. भोपळ्याच्या अशाच काही औषधी गुणधर्माबाबत जाणून घेऊ.

**भोपळ्यात 'बिटा करोटिन'**

- या घटकाचं प्रमाण बरंच जास्त असतं. यामुळे भोपळा हा 'अ' जीवनसत्त्वाचा समृद्ध स्रोत मानला गेलाय. बिटा केरोटिनमधील ऑंटिऑक्सिडंट्समुळे शरीरातील फ्री रेडिकल्सचा सामना अगदी सहज करता येतो.
- भोपळा हे तापावरचं औषध आहे.
- भोपळ्यातील विशिष्ट्य प्रकारच्या खनिजांमुळे मेंदूच्या नसांना आराम मिळतो.
- हृदयरोग्यांसाठी भोपळा वरदान मानला जातो. भोपळ्यात कोलेस्ट्रॉल कमी करण्याची क्षमता असते.
- आतड्यांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही भोपळा गुणकारी मानला जातो. भोपळ्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात राहते.
- बहुसंख्य महिलांमध्ये लोहाची कमतरता आढळते. अशा महिलांनी भोपळ्याच्या बियांचं सेवन करावं. भोपळ्याच्या बियांमध्ये लोह, झिंक, पोटॅशियम आणि मॅग्नेशियम यांचे प्रमाण भरपूर असल्याने बरेच लाभ होतात.
- पोटाच्या विविध विकारांवर भोपळा गुणकारी ठरू शकतो. यातील फायबरमुळे पचनक्रिया सुधारते आणि पोट स्वच्छ झाल्याने अनेक रोगांना दूर ठेवता येतं.



# नखे अशी सांभाळा

**आपल्या शरीरातील कोणताही अवयव मग तो छोटा असो वा मोठा जोपर्यंत स्वस्थ असतो आणि त्याच्या कार्यात कुठेही बाधा येत नसते तोपर्यंत शरीरात कोणत्याही व्याधी निर्माण होत नसतात. मात्र काही वेळा अगदी बारीकसारीक दुखणीही कमालीची वेदनादायक ठरतात. आपल्या बहुतेक सर्व कामामध्ये हाताची बोटे आपण वापरत असतो. अनेक वेळा या बोटांच्या नखांना इजा होतात आणि त्यात पाणी जाऊन पू होतो आणि मग बोटांना ठणका लागतो. त्यावेळी हे उपाय करून पाहावेत.**



**नख दुभंगणे, जिव्हाळे लागणे**

ज्या बोटाला हा विकार असेल त्या बोटाला घट्ट चिकटपट्टी बांधावी. हा विकार अगदी थोडक्या काळासाठी असतो व बरेच वेळा १-२ दिवसांतच बरा होतो.

**नखुरडे**

बऱ्याच वेळा नखुरडे झाल्याने बोटाला ठणका लागतो. यातही बोटाला चिकटपट्टी घट्ट बांधल्यास नखुरडे लवकर फुटते. दुसरा उपाय म्हणजे शेंदूर व अंड्याचा पांढरा बलक खलून लावल्याने आराम पडतो. शेंदूर हा अँटीसेप्टीक म्हणून काम करतो.



**नखे वेळच्या वेळी कापणे**

हाताच्या बोटांची तसेच पायाच्या बोटांची नखे वेळच्या वेळी कापणे, त्यात अडकलेली घाण वेळच्या वेळी काढणे हे एकंदर आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. वय वाढत जाईल तसा नखांचा कडकपणा वाढत जातो. वृद्ध वयात तर नखे कापणेही अवघड जाते. अशावेळी पाण्यात बोरीक पावडर टाकून पाय थोडा वेळ बुडवून ठेवावेत व मग नेलकटरच्या सहाय्याने नखे कापावीत. अंघोळ झाल्यानंतरही नखे गरम पाण्यामुळे मऊ पडलेली असतात. त्यावेळी ती काढावीत. तसेच नखे कापताना अगदी त्वचेजवळ कापू नयेत. त्यामुळे जिव्हाळे लागण्याचा संभव कमी होतो.

**लहान बाळाची नखे कापतानाही**

अगदी लहान बाळाची नखे कापतानाही बाळाची अंघोळ होऊन बाळ झोपले की मगच ती अलगद काढावीत.

# सौंदर्यप्रसाधनं ठेवा फ्रीजमध्ये

फ्रीजमध्ये नाशवंत पदार्थ ठेवले जातात. मात्र केवळ नाशवंत खाद्यपदार्थच फ्रीजमध्ये ठेवावेत असं नाही. लवकर खराब होणारी काही सौंदर्यप्रसाधनंदेखील फ्रीजमध्ये ठेवता येतील. फ्रीजमध्ये थंड वातावरणात प्रसाधनांमध्ये बॅक्टेरिया उत्पन्न होण्याचा धोका कमी होतो. त्याबरोबर प्रसाधनाचा रंग आणि आकार सुरक्षित राहतो. अशी कोणती प्रसाधनं फ्रीजमध्ये ठेवावीत, जाणून घेऊया....



- परफ्यूम नेहमी थंड आणि कोरड्या जागी ठेवायला पाहिजे म्हणूनच परफ्यूम ठेवण्यासाठी फ्रीज ही योग्य जागा आहे. या थंड वातावरणामुळे परफ्यूमचं शेल्फ लाईफ वाढतं.
- डोळ्याखालील काळी वर्तुळं घालवण्यासाठी आय क्रीम्स वापरली जातात. कोल्ड आय क्रीममुळे डोळ्याखालची सूज कमी होते त्याचप्रमाणे काळवंडलेपणा कमी होतो. आय क्रीम्स फ्रीजमध्ये ठेवावीत.
- उन्हाळ्यात लिपस्टिक विरघळते. मूळ आकार नाहीसा होतो. अशी विरघळलेली लिपस्टिक लावणं कठीण जातं. शिवाय उष्ण तापमानामुळे लिपस्टिकमधील रसायनांमध्ये बदल घडू शकतो. मूळ रंग हरवण्याचाही धोका असतो. हे सर्व टाळण्यासाठी उन्हाळ्यात लिपस्टिक फ्रीमध्ये ठेवावी.
- फेशियल मास्क ठेवण्यासाठीही फ्रीज ही उत्तम जागा आहे. बाहेरच्या तापमानात फेशियल मास्कमधील काही महत्त्वपूर्ण घटक नष्ट होऊ शकतात.
- सध्या ऑर्गेनिक मेकअपचा बोलबाला आहे. अत्यंत चांगले परिणाम मिळत असल्यामुळे ही प्रसाधनं महिलांच्या पसंतीत उतरत आहेत. मात्र ऑर्गेनिक किंवा होममेड प्रसाधनांमध्ये प्रिझर्व्हेटिव्ह नसतात. म्हणून ती लवकर खराब होतात. हे टाळण्यासाठी ऑर्गेनिक प्रसाधनं फ्रीजमध्ये स्टोअर करावीत.
- व्हिटॅमिन सी युक्त सर्व प्रसाधनं सक्रिय घटकांनी युक्त असतात. त्याचप्रमाणे प्रसाधनांमध्ये रेटिनॉल आणि पेप्टाईड असल्यास अधिक काळजी घ्यावी लागेल. उग्र तापमानात या रसायनांच्या संरचनेत बदल होऊ शकतो. म्हणूनच अशी प्रसाधनं फ्रीजमध्ये ठेवावीत.

# वापरा नॅचरल टोनर

**चेहरा** ऑईली असेल तर घरगुती बनवलेल्या टोनरच्या सहाय्याने सुस्थितीत राखता येतो. तेलकट त्वचेसाठी काकडीपासून बनवलेले टोनर उपयुक्त ठरते. त्याचप्रमाणे टोमॅटोपासून बनवलेल्या टोनरच्या वापराने चेहऱ्याचा वर्ण उजळतो आणि मुरुमांची समस्या कमी होते. तुलसी टोनरही विशेष लाभकारक ठरते.

यासाठी तुळशीची पाने चुरडून उकळत्या पाण्यामध्ये सोडावीत. थंड झाल्यावर या पाण्यामध्ये एक चमचा कोरफडीचा गर मिसळावा. आता तयार मिश्रण बाटलीत भरून टोनरसारखे वापरावे, याच पद्धतीने मेथी घालून अथवा हळदीच्या सहाय्याने टोनर बनता येते. हळदीचे टोनर बनवताना एक चमचा लिंबाचा रस मिसळण्यास विसरू नये.



एखाद्याच्या शारीरिक स्वास्थ्याचा अंदाज शरीराच्या सुदृढतेवरून लावला जातो. त्यामुळे बळकट आणि 'टोन्ड' स्नायू, उत्तम स्टॅमिना आणि अर्थातच न सुटलेले पोट यावरून एखाद्याच्या स्वास्थ्याचा अंदाज लावता येऊ शकतो. नियमित व्यायाम आणि संतुलित आहाराने शरीर सुदृढ आणि सुडौल होत असतानाच पोटावर असलेली चरबी कमी करणे हे सर्वात मोठे आव्हान ठरू शकते. पोटावर साठलेली चरबी कमी करण्यासाठी प्रयत्न करत असलेल्यांमध्ये याबद्दल अनेक गैरसमजही पाहावयास मिळतात. हे गैरसमज कोणते आणि यामध्ये कितपत तथ्य आहे, हे जाणून घेऊ या.



# पोटावरील चरबी कमी करण्यासाठी या गोष्टी लक्षात घेणे आवश्यक

**व्यायामामध्ये** खास पोटावरील चरबी कमी करण्यासाठी केवळ 'क्रन्चेस' केल्याने चरबी कमी होते हा गैरसमज अनेकांच्या मनामध्ये असतो. क्रन्चेस हा व्यायाम प्रकार पोटावरील चरबी घटवण्यास सहाय्यक असला, तरी केवळ याच्यामुळे पोटाचा घेर कमी होतो असे मात्र नाही. क्रन्चेस करून पोटावरील चरबी कमी करतानाच, सर्व शरीरावरील चरबी कमी होईल अशा प्रकारचा व्यायाम केला जावा. त्यामुळे आपल्या व्यायामामध्ये 'स्ट्रेंग्थ ट्रेनिंग' आणि 'हाय इंटेन्सिटी कार्डियो'सारख्या व्यायाम प्रकारांचाही समावेश असावा.

कित्येकदा केवळ ग्रीन टीच्या सेवनाने पोटावरील चरबी घटण्यास मदत होत असल्याचा समजही अनेकांच्या मनामध्ये दिसून येतो. ग्रीन टीमध्ये अँटी ऑक्सिडंट्स मुबलक मात्रेमध्ये असल्याचे जरी खरे असले, तरी केवळ ग्रीन टी प्यायल्यानेच पोटावरील चरबी कमी होते असे समजणे चुकीचे आहे. पोटावरील चरबी कमी करण्यासाठी ग्रीन टीच्या जोडीनेच संतुलित, पौष्टिक आहार आणि योग्य व्यायामाचीही आवश्यकता असते. नियमित व्यायाम केल्याने आपल्या मनाला येईल ते आपण खाऊ-पिऊ शकतो अशी समजूत वजन आणि अर्थातच पोटावरील चरबी वाढण्यास कारणीभूत ठरत असते. योग्य आहार आणि नियमित व्यायाम हे एकमेकांना पूरक असून, यांच्यामधील योग्य संतुलन साधता आल्यानेच पोटावरील चरबी घटवता येणे शक्य होत असते.

बाजारामध्ये उपलब्ध असलेले तथाकथित 'लो फॅट', पॅकेज्ड अन्नपदार्थ वजन घटवण्यासाठी चांगला पर्याय असल्याचेही अनेक लोक मानतात. पण वास्तविक आहारामध्ये इतर सर्व पोषक तत्त्वांच्या सोबत स्निग्ध पदार्थदेखील आवश्यक असतात. त्यामुळे आहारातून शरीराला 'गुड फॅट्स' मिळतील असे अन्नपदार्थ आपल्या आहारामध्ये समाविष्ट असायला हवेत. शरीराला चांगले असे स्निग्ध पदार्थ आहारातून घेतले गेल्याने भूक लवकर शमण्यास मदत होत असते. त्यामुळे सातत्याने 'लो-फॅट' पदार्थांच्या सेवनाने शरीराला फायदा होण्याऐवजी नुकसान होण्याची शक्यताच जास्त असते. आपल्या आहारामध्ये तूप, चांगल्या प्रतीची खाद्यतेले यांचा समावेश अवश्य असावा. कमी खाल्ल्याने पोटावरील चरबी कमी होते असाही एक गैरसमज आढळून येत असतो. भोजन घेताना आपण किती खात आहोत याकडे लक्ष असणे अगत्याचे असले तरी आपली भूक मारणे किंवा नावापुरते काही तरी खाऊन अधिक काळ स्वतःला उपाशी ठेवणे याचे अपायच अधिक आहेत.

आपल्या शरीराला आवश्यक तितका आहार मिळाला नाही, तर शरीराची चयापचय शक्ती कमी होते आणि त्यामुळे वजन घटण्याची प्रक्रियाही मंदावते. त्यामुळे माफक आहाराद्वारे शरीराला आवश्यक इतकी कर्बोदके, प्रथिने, क्षार, जीवनसत्त्वे आणि अन्य पोषक तत्त्वे मिळतील याकडे लक्ष देणे गरजेचे असते. याकामी गरज भासल्यास आहारतज्ज्ञांचा सल्ला अवश्य घ्यावा.



**मिठी नदी शेजारी उभारा व्हीआयपींसाठी स्वागत**
मिठी नदीच्या सफाईसाठी जिथे ९० ते १२० दिवसांची गरज असताना प्रत्यक्षात केवळ ६० दिवसांचा कालावधी मिळत आहे. त्यामुळे या नदीसह नाल्यांची योग्यप्रकारे सफाई होणे आवश्यक आहे. परंतु आता सर्वच लोकप्रतिनिधीं या गाळाच्या सफाईच्या कामांची पाहणी करण्यासाठी मिठी नदीच्या ठिकाणी भेटी देत आहे आणि प्रत्येकाला प्रमुख अभियंता आणि उपप्रमुख अभियंताच त्यांच्या स्वागतासाठी हवा आहे. त्यामुळे ते नाराज होत असून आधीच मिठी नदीसह नाल्यांची सफाईचे काम निधारींत वेळेत पूर्ण करणे आवश्यक असताना भेटी देणाऱ्या व्हीआयपींच्या मागे अधिकाऱ्यांना धावावे लागते. त्यामुळे आता मिठी नदीसह मोठ्या नाल्यांच्या शेजारी स्वागत कक्ष उभारुन तिथे सध्या कामाचा भार नसलेल्या प्रमुख अभियंता दजार्चा अधिकारी बसवला जावा अशी मागणी आता विनोदान केली जाते. जेणेकरून त्या दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या हाताला काम मिळेल आणि भेटी देणाऱ्यांचे स्वागत करायलाही अधिकारी सज्ज असेल आणि त्यामुळे या विभागावरील नाराजी कमी होईल,असे बोलले जात आहे.

# मिठी नदी, नालेसफाईच्या कामांबाबत गैरप्रकार झाल्यास थेट कारवाई

## महापालिका अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांनी दिला इशारा

**■ बातमी /लेख,**
**प्रीती दिपक नाईक**

नालेसफाईच्या संपूर्ण प्रक्रियेवर अभियंत्यांचे वैयक्तिक लक्ष असणे आवश्यक आहे. तसेच नालेसफाईच्या कामाच्या दरम्यान अभियंत्यांची उपस्थिती असणे अनिवार्य आहे. कंत्राटदारामार्फत केल्या जाणाऱ्या कामामध्ये संपूर्ण पारदर्शकता रहावी, यासाठी अभियंत्यांनी दक्ष राहणे आवश्यक आहे. जर कुठेही जाणिवपूर्वक गैरप्रकार करण्याचा कुणी प्रयत्न केला, असे निदर्शनास आले तर कंत्राटदार व अधिकारी या दोघांवर अत्यंत गंभीर कारवाई केली जाईल, याची दक्षता घ्यावी, असा इशारा वजा सूचना. बांगर यांनी दिला.

मुंबईतील नाले आणि नद्या स्वच्छतेची कामे विहित वेळेत पूर्ण करण्यासाठी मुंबईमहानगरपालिका प्रशासनाकडून सूक्ष्म नियोजनावर भर दिला जात आहे. या अनुषंगाने मुंबई महानगरातील लहान व मोठ्या नाल्यांमधून गाळ काढण्याची कामे सुरू करण्यात आली आहेत. या पार्श्वभूमीवर अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी मिठी नदी व पूर्व उपनगरांमध्ये सुरू असलेल्या नालेस्वच्छता कामांची शुक्रवारी ३ एप्रिल २०२६ रोजी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी प्रमुख अभियंता (पर्जन्य जलवाहिन्या) कल्पना राऊळ, उप प्रमुख अभियंता संजय इंगळे यांच्यासह संबंधित अधिकारी, अभियंते उपस्थित होते.

मुंबई महानगरपालिकेकडून १२ मार्च २०२६ पासून गाळ काढण्याची कामे हाती घेण्यात आली आहेत. पूर्व उपनगरांतील मिठी नदीवर सुरू असलेल्या तीन पॅकेज अंतर्गत पाच ठिकाणी कामांची सुरुवात झाली आहे. त्यापैकी तीन ठिकाणी (कनेक्टर ब्रिज, वांद्रे-कुर्ला संकुल परिसरातील एमएमआरडीए कार्यालय (जेतवन उद्यान) आणि अंबानी शाळालगत) बांगर यांनी भेट दिली. यासोबतच मुलुंड पूर्व (टी विभाग) येथील बाऊंड्री नाला, घाटकोपर (एन विभाग) येथील सोमय्या नाला येथेही भेट दिली. तसेच आवश्यक ते निर्देश दिले. यासोबतच गाळ काढण्याच्या कामात स्थानिक लोकप्रतिनिधींशी समन्वय ठेवून त्यांच्या सूचनांच्या बाबतीत गांभीयार्ने पूर्तता करावी, अशाही सूचना बांगर यांनी केल्या.

मुंबईतील मिठी नदीच्या तीनही पॅकेज अंतर्गत आणि मोठ्या, छोट्या नाल्यांतून गाळ काढण्याच्या कामांचा वेग वाढविण्यात यावा. ज्याठिकाणी पावसाचे पाणी तुंबते अशा ठिकाणांवर प्राधान्याने आणि सुयोग्य नियोजनासह लक्ष देण्यात यावे. पाणी साचण्याच्या ठिकाणांबाबत आवश्यक कार्यवाही करून तो निकाली निघेल, अशा पद्धतीने नालेसच्छतेच्या कामांचे नियोजन करावे. नालानिहाय कामे कधी सुरू होणार, कधी संपणार याचे काटेकोर नियोजन करण्यात यावे. ही माहिती नालेसफाईच्या महानगरपालिकेच्या डॅशबोर्डवर उपलब्ध करून द्यावी. जेणेकरून आपल्या परिसरातील नालेसफाईचे काम कधी सुरू होणार आहे व कधी संपणार आहे, याची माहिती नागरिकांना मिळणे शक्य होईल. नालानिहाय दर दिवसाला केल्या जाणाऱ्या कामाचे उद्दिष्ट निश्चित करून त्याची काटेकोर अंमलबजावणी होईल, याची दक्षता घ्यावी. कंत्राटदाराने निविदा अटीशर्तीप्रमाणे किती यंत्रसामुग्री वापरात आणणे अपेक्षित आहे व दररोज किती यंत्रसामुग्री उपलब्ध आहे, याची अद्ययावत माहिती उपलब्ध करावी. ही माहिती नालेसफाईच्या संगणक प्रणालीवरसुद्धा (डॅशबोर्ड) प्रदर्शित करण्यात यावी. नाल्यांमधील पाण्यावर वाहणारा तरंगता कचरा समुद्रात जाण्यापासून रोखण्यासाठी शक्य तेथे तरंगता कचऱ्याला अटकाव करणारी यंत्रणा अर्थात ट्रॅशबुम प्रणाली लावण्यात यावी, असे विविध निर्देश अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी दिले.

## नागपूर-गोवा शक्तीपीठ महामार्गाचा सुधारित आराखडा मंजूर

# शेतकरी आंदोलनानंतर प्रकल्पात मोठे बदल, खर्च १ लाख कोटींवर

**■नागपूर। प्रतिनिधी,**

महाराष्ट्रातील कनेक्टिव्हिटी आणि आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी राज्य सरकारने शक्तीपीठ एक्सप्रेसवेच्या सुधारित आराखड्याला मंजुरी दिली आहे. या नव्या आराखड्यात शेतकरी आणि पर्यावरणीय आक्षेप लक्षात घेऊन महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले असून, प्रकल्पाची लांबी, खर्च आणि भौगोलिक विस्तार वाढला आहे.

**लांबी आणि खर्चात मोठी वाढ**

नुकत्याच मंजूर झालेल्या आराखड्यानुसार, एक्सप्रेसवेची लांबी ८०२.५९२ किमीवरून ८५६.७६५ किमीपर्यंत वाढली असून सुमारे ५४ किमीची वाढ झाली आहे. तसेच प्रकल्पाचा अंदाजित खर्च सुमारे ८०,००० कोटी रुपयांवरून जवळपास १ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढला आहे.

**कोणकोणत्या भागातून जाणार मार्ग?**

नवा कॉरिडॉर वर्धा ते सिंधुदुर्ग असा



**शेतकऱ्यांचा विरोध आणि बदल**
पूर्वीच्या आराखड्यावर विशेषतः कोल्हापूर भागात शेतकऱ्यांचा तीव्र विरोध झाला होता, कारण सुपीक शेती जमीन बाधित होत होती. या आंदोलनांमुळे ऑक्टोबर २०२४ मध्ये जमीन संपादनाची अधिसूचना मागे घेण्यात आली होती आणि प्रकल्प राजकीयदृष्ट्या संवेदनशील बनला होता.

असणार आहे. हा मार्ग नांदेड, हिंगोली, परभणी, सोलापूर, सांगली, कोल्हापूर यांसह अनेक जिल्ह्यांतून जाणार आहे, ज्यामुळे राज्यातील विविध भागांमध्ये थेट कनेक्टिव्हिटी निर्माण होणार आहे.

**सातारा जिल्ह्याचा समावेश**

सुधारित आराखड्यात सातारा जिल्ह्याचा नव्याने समावेश करण्यात आला आहे. सुमारे ४० किमीचा मार्ग गोंदवले आणि शिखर शिंगणापूर गावांमधून जाणार आहे.

**जमीन संपादन प्रक्रिया**

या प्रकल्पासाठी सुमारे ८,७६० हेक्टर जमीन संपादन आवश्यक आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, सुमारे एक-तृतीयांश गावांमध्ये संयुक्त मोजणी पूर्ण झाली असून पुढील टप्प्यात जमीन संपादन प्रक्रिया सुरू होणार आहे.

**पर्यावरणीय चिंता**

पर्यावरणतज्ज्ञांनी पश्चिम घाट आणि कोकणातील संवेदनशील भागांमधून मार्ग जाण्याबाबत चिंता व्यक्त केली होती. त्यामुळे हा प्रकल्प काही काळ स्थगित ठेवण्यात आला होता.

**नवा आराखडा कसा तयार झाला?**

२०२५ मध्ये सरकारने एमएसआरडीसीला पर्यायी मार्गाचा अभ्यास करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार सध्याचा सुधारित आराखडा तयार करण्यात आला आहे.

**प्रकल्पाचे फायदे**

हा ६-लेन ग्रीनफिल्ड एक्सप्रेसवे १३ जिल्हे आणि ४० तालुक्यांना जोडणार आहे. माहूर (नांदेड), तुळजापूर (धाराशिव) आणि कोल्हापूर यांसारख्या धार्मिक स्थळांना यामुळे थेट जोड मिळणार आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे नागपूर ते गोवा प्रवासाचा कालावधी १८ तासांवरून अंदाजे ८ तासांपर्यंत कमी होण्याची अपेक्षा आहे. याशिवाय व्यापार, पर्यटन आणि प्रादेशिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे.

# अखेर पी अँड टी कॉलनीतील पाणी प्रश्न मिटला



**पी अँड टी कॉलिनी प्रभाग पाणी टँकर मुक्त होणार!**
कॉलनीत पाणी नाही म्हणून पाणी टँकर मागवित असल्याने त्यांच्या खिशाला भुर्दन्ड बसत होता. पाणी टँकर मुक्त प्रभाग हे स्वप्न यामुळे पुर्ण झाले असे महिला सांगत आहेत.

**■डोंबिवली। प्रतिनिधी,**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत भाजपा नगरसेविका अ‍ॅड. कविता मिलिंद म्हात्रे यांनी त्यांच्या प्रभागातील पाणी प्रश्न उपस्थित केला होता. आपल्या प्रभागातील पाणी प्रश्न सोडविण्यासाठी पालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केला. या पाठपुराव्याला यश आले असून येथील पाणी प्रश्न सुटल्याचे नगरसेविका अ‍ॅड. म्हात्रे यांनी स्पष्ट केले. जनतेला दिलेला शब्द पुर्ण केला असून भाजपने करून दाखवलं अशी चर्चा होत आहे.

दरम्यान कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकरता स्वतंत्र धरण असावे अशी मागणी नागरिकांनी केली असता भाजपा पदाधिकारी मिलिंद म्हात्रे यांनी भाजपा प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण हे प्रयत्न करत असून नक्कीच स्वतंत्र धरण होईल असा विश्वास व्यक्त केला आहे.

पूर्वेकडील पी अँड टी कॉलिनी येथील काही इमारतींना अनेक दिवसांपासून पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. येथील नगरसेविका अ‍ॅड. कविता म्हात्रे व भाजपा पदाधिकारी मिलींद म्हात्रे यांच्याकडे येथील राहिवाशांनी आपली हि समस्या मांडली.

पी अँड टी कॉलिनी येथे काही इमारतीत पाणी कमी दाबाने येत असल्याने रहिवाशी वैतागले होते. येथील रहिवाशांनी भाजपा नगरसेविका अ‍ॅड. कविता म्हात्रे यांना पाणी समस्येबाबत माहिती दिली. नागरिकांच्या या गांभीर समस्येवर भाजपा नगरसेविका अ‍ॅड. म्हात्रे यांनी प्रशासनाकडे सतत पाठपुरावा केला. येथे एकच पाणी लाईन असल्याची माहिती मिळताच नगरसेविका अ‍ॅड. कविता म्हात्रे व भाजपा पदाधिकारी मिलिंद म्हात्रे यांनी पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडे मागणी करुन आणखी एक पाण्याची लाईन मंजूर करून घेतली.

# मच्छिमारीवरील डिझेल दरवाढ कायम

## प्रति लिटर २२ रुपयांची वाढ, केंद्राकडून दिलासा नाही




**"सरकारने आमच्या तोंडाला पाने पुसली"**
सरकारकडून कोणताही ठोस दिलासा मिळाला नाही. तातडीने अनुदान, सवलतीचे डिझेल किंवा आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी राज्य मच्छिमार संघटनेचे माजी अध्यक्ष विजय गिदी यांनी केली. डिझेल दरवाढीमुळे सध्या केवळ १० टक्के मच्छिमारच समुद्रात उतरत असल्याचे सांगितले जात आहे. उर्वरित दोन महिन्यांचा मासेमारी हंगाम धोक्यात येण्याची शक्यता आहे.

**■मुरूड-जंजिरा। प्रतिनिधी,**

युद्धजन्य आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे इंधन दरात कपात करणे सध्या शक्य नसल्याचे स्पष्ट करत हरदीप सिंग पुरी यांनी मच्छिमारांच्या शिष्टमंडळाला कोणताही दिलासा देण्यास नकार दिला आहे. या भूमिकेमुळे किनारपट्टीवरील मच्छिमार संघटनांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. डिझेल दरात प्रति लिटर तब्बल २२ रुपयांची वाढ झाल्याने मच्छिमारांचे कंबरडे मोडले असून अनेक यांत्रिक बोटी समुद्रात न जाता किनाऱ्यावरच थांबल्या आहेत. मुरूड-जंजिरा तालुक्यातील राजपुरी, एकदरा आणि मुरूड किनाऱ्यावर सुमारे ९० टक्के बोटी नांगरून ठेवण्यात आल्याचे चित्र आहे.

सामान्य पंपावर डिझेल सुमारे ९२ रुपये प्रति लिटर दराने उपलब्ध असताना, मच्छिमारांना 'बल्क कॅटेगरी'तून ११४ रुपये प्रति लिटर दराने डिझेल घ्यावे लागत आहे. त्यामुळे खर्चात मोठी वाढ झाली असून उत्पन्न घटल्याने मच्छिमार दुहेरी संकटात सापडले आहेत.

मच्छिमार संघटनांचे म्हणणे आहे की, सहकारी संस्थांमध्ये समावेश असलेल्या मच्छिमारांना 'बल्क ग्राहक' श्रेणीत ठेवणे अन्यायकारक आहे. त्यांना या श्रेणीतून वगळून सवलतीच्या दरात डिझेल द्यावे, अशी मागणी होत आहे.

**मुख्य सूत्रधार कोण?**
दरम्यान, या लज्जास्पद घटनेनंतर स्थानिक नागरिक आणि पीडित विद्यार्थिनींच्या पालकांनी संताप व्यक्त केला असून या प्रकाराचा तीव्र निषेध केला आहे. आरोपींविरुद्ध लवकरात लवकर आणि कठोर कायदेशीर पावले उचलून न्याय मिळावा, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे. अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मॅरेज हॉल आणि सार्वजनिक ठिकाणांवर कडक देखरेख ठेवण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले आहे. सध्या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी सुरू असून पोलीस यामागील मुख्य सूत्रधाराचा शोध घेत आहेत.

# 80 मुलं-मुली आक्षेपार्ह अवस्थेत ताब्यात

## मॅरेज हॉलमध्ये सुरु होता भलताच प्रकार, 31 अल्पवयीनांचा समावेश

**■ठाणे। प्रतिनिधी,**

ज्या मॅरेज हॉलवर लग्न किंवा इतर काही समारंभ होणं अपेक्षित असतं त्या ठिकाणी काहीतरी वेगळाच प्रकार सुरु होता. पोलिसांनी एका गुप्त माहितीच्या आधारे या हॉलवर छापा मारला.

यावेळी त्यांना हादरवून टाकणारं एक दृश्य दिसलं. तब्बल ८० तरुण आणि तरुणी पोलिसांना आक्षेपार्ह अवस्थेत आढळून आले. या सर्वांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. यामध्ये 39 महिला आणि 41 पुरुषांचा समावेश आहे. या सर्वांना आता न्यायालयात हजर करण्यात आले आहे. यामध्ये ग्रामीण भागातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थिनींचाही मोठा सहभाग असल्याचे समोर आले आहे. बिहारच्या रोहतास जिल्ह्यातील ही घटना आहे.

**31 अल्पवयीन मुलं ताब्यात**

या कारवाई दरम्यान पोलिसांनी एकूण 31




अल्पवयीन मुलांनाही ताब्यात घेतले असून, त्यामध्ये 18 मुली आणि 13 मुलांचा समावेश आहे. अल्पवयीन मुलींच्या बाबतीत 'पॉक्सो' कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांची वैद्यकीय तपासणी करून त्यांना बाल कल्याण समितीच्या संरक्षणाखाली पाठवण्यात आले आहे. तसेच, सज्ञान महिलांसोबत आक्षेपार्ह स्थितीत आढळलेल्या अल्पवयीन मुलांच्या प्रकरणाचीही सखोल चौकशी सुरू आहे. या घटनेच्या गांभीयार्मुळे प्रशासनाने दोषींवर कठोर कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत.

**मोठं रॅकेट असण्याची शक्यता**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणातील सर्व आरोपींवर विविध कलमान्वये गुन्हे नोंदवून तपास केला जात आहे. ही घटना केवळ स्थानिक स्वरूपाची नसून, यामागे एखादी मोठी संघटना किंवा रॅकेट कार्यरत असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. या प्रकरणाची व्याप्ती मोठी असू शकते, त्यामुळे बेकायदेशीर कारवाया करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यासाठी पोलीस सर्व बाजूंनी तपास करत आहेत. 'हे प्रकरण कोणत्याही मोठ्या गुन्हेगारी नेटवर्कचा भाग असू शकते, त्यामुळे आम्ही अत्यंत गांभीयार्ने तपास करून दोषींना कठोर शिक्षा देण्यास बांधील आहोत,' असे स्पष्ट मत एसडीपीओ यांनी व्यक्त केले आहे.

**सोशल मीडियावरील मैत्रीचा रक्तरंजित अंत**
पोलिसांनी केलेल्या सखोल चौकशीत समोर आले की, शीलाची हत्या दुसऱ्या कोणी नसून तिच्या प्रियकराने, अरुण कुमारने केली आहे. अरुण हा बिहारमधील रोहतास जिल्ह्याचा रहिवासी असून 2022 मध्ये सोशल मीडियाच्या माध्यमातून या दोघांची मैत्री झाली होती. दोघांनाही रिल्स बनवण्याची प्रचंड आवड होती आणि याच आवडीतून त्यांच्यात जवळीक वाढली होती. मात्र, काही काळानंतर त्यांच्या नात्यात दुरावा निर्माण झाला आणि वादाला सुरुवात झाली. अरुणच्या म्हणण्यानुसार, शीला त्याच्याकडे सातत्याने पैशांची मागणी करत होती आणि त्याला ब्लॅकमेल करत होती. अरुणने आतापर्यंत तिला ऑनलाइन आणि रोख स्वरूपात सुमारे 1,50,000 रुपये दिले होते. मात्र, पैशांच्या मागणीसोबतच अरुणला शीलावर संशय येऊ लागला की ती दुसऱ्या कोणाशी तरी बोलत असून त्याला फसवत आहे, याच संशयातून त्याने हत्येचा कट रचला.

## रील करण्याच्या बहाण्याने गर्लफ्रेंडचे दोन्ही हात मागे बांधले

# अन् थंड डोक्याने थेट गळा चिरुन टाकला... नेमकं कारण काय?

**■नागपूर। प्रतिनिधी,**

उत्तर प्रदेशातील गोंडा जिल्ह्यातून प्रेम, संशय आणि ब्लॅकमेलिंगच्या जाळ्यात अडकलेल्या एका तरुणाने आपल्या प्रेयसीची निर्घृण हत्या केल्याची काळजाचा थरकाप उडवणारी घटना समोर आली आहे. देहात कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भीटी भदवल गावात 25 वर्षीय शीला नावाची तरुणी 29 मार्च रोजी बेपत्ता झाली होती. तिच्या कुटुंबीयांनी सर्वत्र शोध घेऊनही ती न सापडल्याने अखेर पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास सुरू असतानाच 2 एप्रिल रोजी गावातील एका उसाच्या शेतात या तरुणीचा मृतदेह आढळून आला, ज्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. या घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक विनीत जयस्वाल यांनी तात्काळ एसओजी आणि सर्व्हिलन्स टीमसह 4 विशेष पथके तयार करून तपासाची चक्रे फिरवली, ज्यातून हत्येचे धक्कादायक वास्तव समोर आले.

**रिल्स बनवण्याच्या बहाण्याने बोलावून संपवले आयुष्य**

आपल्या मागातील काटा दूर करण्यासाठी अरुणने 29 मार्च रोजी शीलाला भीटी भदवल गावातील एका उसाच्या शेतात भेटायला बोलावले. तिथे रिल्स बनवण्याचा बहाणा करून त्याने तिला गाफिल ठेवले आणि चालाकीने तिचे दोन्ही हात पाठीमागे बांधले. शीलाला काही समजण्यापूर्वीच अरुणने आपल्याकडील चाकूने तिचा गळा चिरला आणि तिची जागीच हत्या केली. हे क्रूर कृत्य केल्यानंतर तो पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न करून तिथून फरार झाला. उसाच्या शेतात मृतदेह सापडल्यानंतर पोलिसांनी तांत्रिक पुरावे आणि सर्व्हिलन्स टीमच्या मदतीने अरुणचा माग काढला. संशयाच्या एका चुकीच्या समजापोटी आणि पैशांच्या वादातून एका तरुणाने आपल्या प्रेयसीचे जीवन अशा प्रकारे संपवल्यामुळे सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे.

**आरोपीला अटक आणि पोलीस कारवाई**

अप्पर पोलीस अधीक्षक मनोज कुमार रावत यांनी माहिती दिली की, पोलिसांनी आरोपी अरुण कुमारला अटक केली असून त्याच्याकडून हत्येत वापरलेला चाकू देखील जप्त केला आहे. चौकशीदरम्यान आरोपीने आपला गुन्हा कबूल केला असून प्रेयसीकडून होणारी पैशांची मागणी आणि तिच्या चारित्र्यावरील संशय यामुळे आपण हे पाऊल उचलल्याचे त्याने सांगितले. पोलिसांनी तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपीला ट्रॅक केले आणि अखेर त्याला बेड्या ठोकल्या. आरोपीला न्यायालयात हजर केले असता, तिथून त्याची रवानगी कारागृहात करण्यात आली आहे. या घटनेने पुन्हा एकदा सोशल मीडियावरील मैत्री आणि त्यातून निर्माण होणाऱ्या अनपेक्षित धोक्यांवर प्रकाश टाकला आहे. पोलीस आता या प्रकरणातील पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत असून पीडितेच्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न शील आहेत.




# मोबाईल चार्जरच्या वायरने गळा आवळून प्रेयसीची हत्या अन् केला आत्महत्येचा बनाव

**■चंद्रपूर। प्रतिनिधी,**

चंद्रपूरमध्ये लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या तरुणाने प्रेयसीचा मोबाईल चार्जरच्या वायरने गळा आवळून खून केला आणि त्यानंतर आत्महत्येचे नाटक रचल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. २० दिवसांनंतर आलेल्या शवविच्छेदन अहवालातून हा खून असल्याचे स्पष्ट झाले.

**२० दिवसांनी प्रकरणाला वळण**

ही घटना १४ मार्च रोजी रात्री सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास घडली होती. मात्र, ३ एप्रिल रोजी पोस्टमॉर्टम अहवाल आल्यानंतर हा खून असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल करत तपासाला वेग दिला. मृत महिलेची ओळख प्रियंका वांढरे अशी असून, आरोपी अंकेश योगेश बहिरवार (२२) याला अटक करण्यात आली आहे. प्रियंका ही अंकेशपेक्षा सात वर्षांनी मोठी होती.

**लिव्ह-इनमध्ये राहणाऱ्या दोघांमध्ये वाद**

'इंडिया टुडे'च्या वृत्तानुसार, प्रियंका पतीपासून वेगळी राहत होती. त्यानंतर तिची अंकेशसोबत ओळख होऊन दोघांमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाले आणि दोघेही तिच्या घराच्या वरच्या मजल्यावर एकत्र राहू लागले होते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून घरगुती कारणांवरून त्यांच्यात वारंवार वाद होत होते. पोलिस तपासात समोर आले की, अंकेशवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न आणि कुटुंबीयांशी संपर्क ठेवण्यावरूनही दोघांमध्ये मतभेद वाढले होते.

**वादातून टोकाचे पाऊल**
१४ मार्चच्या रात्री पुन्हा वाद झाल्यानंतर अंकेशने रागाच्या भरात मोबाईल चार्जरच्या वायरने प्रियंकाचा गळा आवळून तिचा खून केला. त्यानंतर त्याने प्रियंकाच्या वडिलांना फोन करून ती बेशुद्ध पडल्याचे सांगत आत्महत्येचा बनाव केला. नातेवाईकांनी तिला रुग्णालयात नेले, मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.

**आरोपीची कबुली, पुरावे जप्त**

सुरुवातीला हा आत्महत्येचा प्रकार असल्याचा अंदाज होता. मात्र, ३ एप्रिल रोजी प्राप्त झालेल्या शवविच्छेदन अहवालात गळा आवळून खून झाल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर पोलिसांनी आरोपीची कसून चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी घटनास्थळावरून गुन्ह्यात वापरलेला मोबाईल चार्जर आणि एक्स्टेंशन बोर्ड जप्त केला असून, आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com